# अमृत कुंभ



वर्ष १४ | अंक ५ | डिसेंबर २० - जानेवारी २१ | मूल्य रु. १३/-




चंद्रपूर : सेवाकेंद्रावर दीपावली मोठ्या थाटामाटात साजरी करताना ब्र. कु. कुसुम, ब्र. कु. कुंदा व अन्य टीचर्स बहिणी



धमतरी : सेवाकेंद्रामध्ये दिवाळी उत्सव साजरा करताना ब्र.कु. सरिता व अन्य टीचर्स बहिणी

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

## अंतरंग

वर्ष १४, अंक ५. डिसेंबर २०२०–जानेवारी २०२१



१. संपादकीय–कर्मयोगेन योगिनाम् २
२. तेच हे ब्रह्माबाबा (कविता) ४
३. प्रभू रंगात रंगूनी ...भाग ३ ६
४. चिंतन ८
५. दादी बृजेन्द्राजी ९
६. राजयोग आणि स्वास्थ्य १३
७. चित्रातून चरित्रनिर्मितीकडे १४
८. तमसो मा ज्योतिर्गमय १५
९. यज्ञेतिहासाची पाने ... १७
१०. ब्रह्माबाबा : एक क्रांतिकारक १९
११. हर्षितमुखता २२
१२. दादी हृदयमोहिनी यांच्यासोबत प्रश्नोत्तरे २३
१३. आत्मिक शांती व आनंदी जीवन २५
१४. सेवा समाचार २७

## मुखपृष्ठाविषयी

सरणारे वर्ष आणि जानेवारी महिना म्हटले की ब्रह्मावत्सांना एकच आठवण येते ती म्हणजे ब्रह्माबाबांची. मुखपृष्ठांत पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या प्रकारे ॐ दाखवून त्यात ब्रह्माबाबांची प्रतिमा चित्रीत केली आहे. परमात्मा शिवाचे साकार माध्यम बनून पिताश्री ब्रह्माबाबांनी त्याग व तपस्येचा आदर्श जगासमोर ठेवला. ॐ म्हणजे 'मी देह नसून आत्मा आहे' याचा सखोल अभ्यास बाबांनी स्वतः केला आणि आपल्यासोबत असणाऱ्या साधकांकडूनही करवून घेतला. १९३७ च्या नंतरच्या काही वर्षात ॐ चा ध्वनी करून राजयोगाच्या साधनेला सुरूवात केली जायची. यामुळेच संस्थेची ओळख प्रारंभी 'ॐ मंडळी' अशी झाली. त्यावेळी लावलेल्या छोट्याशा रोपाचे आज महावृक्षात रूपांतर झाले; पण बाबांची शिकवण आजही कार्य करत आहे. मुखपृष्ठ पाहून या आठवणींचा सागर मनांत उचंबळू लागतो.

– प्रकाशक अमृतकुंभ

**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंटस्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. सचिन उपाध्ये.

**वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या –** www.amrutkumbh.com.

(संपादकीय)

# कर्मयोगेन योगिनाम्



भारतीय तत्त्वज्ञानांत गीतेचे अनन्यसाधारण महत्त्व मानले गेले आहे. किंबहुना 'गीताज्ञान' सर्व शास्त्रांत शिरोमणी असल्याप्रमाणे समजले जाते. प्रचलित समजुतीनुसार हे ज्ञान एकट्या अर्जुनाला युद्धभूमीवर दिले गेले. संपूर्ण महाभारत व त्यातील एक भाग असलेली गीता यात आध्यात्मिक अर्थ दडलेला आहे. कौरव-पांडवांचे जन्म व त्यामागची अद्‌भुतता, आजच्या विज्ञान युगाच्या कसोटीवर घासून पाहिली तर असंभवनीयच वाटावी. इतकेच काय, पण इतकी अक्षौहिणी सेना, युद्धभूमीवर केलेला उपदेश हे सगळेच अतर्क्य वाटते. मात्र त्यामागे जो आध्यात्मिक अर्थ दडलेला आहे, त्याचा आपण आज साकल्याने विचार करणार आहोत. विचार किंवा मनन करता जाणवते यांत गुह्य तत्त्वज्ञान सोपे करून सांगण्याकरिता गोष्टींचे रूप दिले गेले आहे. शालेय कालापासून आपण जाणतो, एखादी गोष्ट सांगितली आणि त्यातून काही बोध घ्यायला शिकवले तर ते कायमस्वरुपी लक्षात राहते. असेच काहीसे अर्जुनाच्या वर्णनातून शिकण्याजोगे आहे.

'अर्जुन' या शब्दाचा सरलार्थ आहे जो ज्ञानार्जन करतो तो. ज्ञान म्हणजे काय याचाही अर्थ करण्याची गरज आहे. आज सर्वत्र Information म्हणजे माहितीचा सुळसुळाट आहे आणि त्यालाच Knowledge म्हणजे ज्ञान म्हटले जाते. खरंतर ज्ञान म्हणजे ज्या गोष्टीच्या जाणीवेने किंवा उपरतीने जीवन पालटते 'ते' म्हणून आपल्या मायबोलीत 'ज्ञान झालं' असा शब्दप्रयोग करत असत. पण काळाच्या ओघात ज्ञान आणि माहितीत गल्लत झाल्याने ज्ञान मिळालं असं आपण म्हणू लागलो. ज्याने आत्मोन्नती होते, ज्याने विकारांचा अंधकार नष्ट होतो ते 'ज्ञान' आणि असे ज्ञान प्राप्त करतो, धारण करतो, तो अर्जुन.

अर्जुनाच्या जीवनातील कथांमध्ये, 'तो उत्कृष्ट धनुर्धर होता' असे वर्णन सापडते. बाणाने नेम साधायचा म्हणजे बुद्धीची एकाग्रता लागते. ज्या लक्ष्यावर बाण सोडायचा आहे, त्या व्यतिरिक्त इतर काही बघायला वाव नसतो. म्हणजेच कर्म करताना बुद्धीची एकाग्रता साधणे अर्थात् धनुर्धर बनण्यासारखेच होय. माशाचा डोळा भेदण्याच्या स्पर्धेत अर्जुनाने प्रथम क्रमांक पटकावला. माशाच्या डोळ्यावर लक्ष्य केंद्रित करणे अर्थात् बिंदूवर मन-बुद्धी एकाग्र करणे. याचा आध्यात्मिक अर्थ आहे – ध्यान केंद्रित करणे. ज्योतिर्बिंदू परमात्म्यावर ध्यान केन्द्रित करणे. **१८ अध्यायी गीतेतील पहिला अध्याय म्हणजे 'मी कोण?' या प्रश्नाची उकल आहे. 'मी शरीर नसून आत्मा आहे' याचे सत्य ज्ञान किंवा जाणीव. याचा अभ्यास म्हणजे अध्यात्मातील विधी आहे. अठरावा अध्याय आपल्याला 'नष्टोमोहः स्मृतिर्लब्धा' बनण्याविषयी शिकवतो ते म्हणजे विधिवत केलेल्या अभ्यासाचे फलित किंवा सिद्धी आहे. जो पहिल्या अध्यायात सांगितलेला विधी (Process) आत्मसात करतो! त्याला सिद्धी (Result) मिळाल्यावाचून राहत नाही. याचं यथार्थ ज्ञान ज्याला झालं तो अर्जुन.**

अर्जुनाच्या वैशिष्ट्यांपैकी अधिक काही पाहूया. अर्जुनाला एक शाप मिळाला होता. त्यानुसार त्याला स्त्रीरूप किंवा नपुंसकाचे रूप धारण करावे लागले. मात्र कधी स्त्रीरूप धारण करायचे ते त्याचे हाती होते. त्याचा कालावधीही एक वर्षाचा होता, त्यानुसार अज्ञातवासात त्याने बृहन्नडेचे रूप धारण केले अशी गोष्ट सांगितली जाते. आध्यात्मिक पातळीवर याचा

विचार केला तर मनुष्यात्म्यात स्त्री व पुरुष दोन्हीच्या गुणवैशिष्ट्यांचा समन्वय आहे. स्त्रीचे वात्सल्यप्रेम व पुरुषाचा पराक्रम या दोहोंनी युक्त आत्मा आहे. मात्र आत्मा ज्या प्रकारचा देह धारण करतो त्यानुसार या गुणांचे आधिक्य दिसून येते. जी व्यक्ती देहभानाच्या पलीकडे जाण्याचा अभ्यास करते तिच्यात स्त्री-पुरुष दोन्ही भूमिकांतील श्रेष्ठ गुणांचा उत्कर्ष होताना दिसून येतो. जसा प्रसंग तशी भूमिका हे एखाद्या श्रेष्ठ नटाचे वैशिष्ट्य असते. तद्वत या विश्वरूपी नाटकांत भूमिका बजावताना कधी बृहन्नडा तर कधी श्रेष्ठ धनुर्धर असे रूप जो धारण करतो तो खरा अर्जुन होय. स्वामी विवेकानंदांसारखी अनेकांची उदाहरणे डोळ्यासमोर येतात. लहानांसोबत लहान म्हणजेच निष्पाप आणि मोठ्यांसोबत तितकेच सखोल तत्त्वज्ञानी अशा भूमिका बजावणाऱ्या महान व्यक्तींची उदाहरणे पुष्कळ सापडतील.

'जेव्हा सामान्य माणूस झोपतो तेव्हा ज्ञानी माणूस जागतो' अशा अर्थाचे सुभाषित आहे. म्हणजेच ब्राह्ममुहूर्तावर योगिजन साधनेकरिता जागे राहतात आणि सामान्य बुद्धीचा माणूस मात्र निद्रादेवीच्या अधीन राहतो. अर्जुनाची अनेक नावे गीतेत येतात. त्याला गुडाकेश, परान्तप किंवा धनंजय, भारत अशा अनेक नावांनी संबोधले आहे. 'गुडाका' म्हणजे निद्रा आणि ज्याने निद्रेवर जय मिळविला आहे तो 'गुडाकेश'. ज्याने श्रेष्ठ तप केले आहे तो 'परान्तप'. याचे एक छान शिल्प महाबलीपूरम येथे पहायला मिळते. तप करून अर्जुनाच्या देहाची अवस्था ऋषींप्रमाणे झाली ते एका शिल्पांत दर्शविले आहे. याचप्रमाणे ज्ञानरूपी धन ज्याचेकडे अक्षय आहे असा तो धनंजय व त्याच्या अक्षय (क्षय न पावणारा) भात्यात परिस्थितीशी लढण्यासाठी ज्ञान बाण आहे तो हा श्रेष्ठ धनुर्धर.

गीतेचे ज्ञान नित्य श्रवण करणारा व दुसऱ्यासही त्या ज्ञानाने लाभान्वित करणारा तो खरा अर्जुन होय. सुरूवातीस म्हटल्याप्रमाणे गीतेचे श्रेष्ठ ज्ञान भारतात उपलब्ध आहे; पण मग परिवर्तनाची प्रक्रिया धीमी का असावी? कदाचित आपण गीतेचे तत्त्वज्ञान 'अर्जुन' नावाच्या कुणा व्यक्तीला सांगितलेले ज्ञान इतपतच विचार करतो. अर्जुन नावाची कुणी व्यक्ती म्हणजे मी नाही तर एक इतिहासकालीन व्यक्ती होऊन गेली असे समजतो; पण मीच असा 'अर्जुन' बनू शकतो आणि मला कर्मकुशल बनायचे आहे. हे जर ठरविले तर त्या गीताज्ञानाचा खरा लाभ घेतला असे म्हणता येईल.

गीतेत कर्मयोग वर्णन केला आहे. ध्यानयोग, संन्यासयोग किंवा ज्ञानकर्म संन्यासयोग असे वेगवेगळे अध्याय आहेत. बहुशः योग म्हणजे पातंजलयोगसुत्रातील आसन, प्राणायाम इत्यादी अर्थ घेतला जातो. काहींच्या मते 'कर्म हाच योग' आहे. कर्म हीच पूजा आणि हाच आमचा कर्मयोग आहे. अनेक समाजसेवी मंडळींना 'कर्मयोगी' म्हटले जाते. आध्यात्मिक दृष्टीकोनातून पाहिल्यावर योग म्हणजे 'जोडणे'. संस्कृतातल्या युज्पासून योग शब्द आला. कर्म करताना मन-बुद्धी परमेश्वराशी जोडणे म्हणजे कर्मयोग साधणे होय. जर एखाद्याचा यथार्थ परिचय असेल तर त्याची आठवण करणे सहजसाध्य होऊ शकते. परमात्म्याचे सत्य स्वरूप हे अव्यक्त किंवा निराकार आहे. स्वतःस देह न समजता चैतन्य आत्मा समजणे व त्या निराकार ज्योतीचे ध्यान करणे म्हणजेच खरा राजयोग किंवा ध्यान योग म्हणता येईल. हाच खरा ज्ञानविज्ञानयोगही म्हणता येईल. जेव्हा आपण 'अभ्यासयोगयुक्तेन चेतसा' या उक्तीप्रमाणे चित्त दुसरीकडे जाऊ न देता अभ्यास करू लागतो तेव्हाच खऱ्या अर्थाने गीतेतील वचनाचे पालन करतो असे म्हणता येईल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर राजयोगाच्या सतत अभ्यासाने निष्काम कर्मयोग साधणाऱ्या योगिजनांच्या मांदियाळीत आपली वर्णी लावता येईल.

***

**टीप** : ज्या वाचकांना ब्रह्माकुमारी संस्थेत शिकविल्या जाणाऱ्या राजयोगाविषयी माहिती नाही असे वाचक, नजीकच्या शाखेत जाऊन राजयोग विनामूल्य शिकू शकतात. तसेच नित्य साधकांना देखील 'अर्जुन' शब्दातील गूढार्थ लाभकारक ठरावा ही शुभेच्छा!



# तेच हे ब्रह्माबाबा

**राजयोगिनी ब्र.कु.गोदावरी दीदी**
**प्रकाशिका**

तेच हे ब्रह्माबाबा, ज्यांच्या तनुत अवतरण शिवपित्याने केले
अंतःचक्षूंनी आम्ही, शिव पित्यास समीपतेने न्याहाळले ।।१।।

शास्त्र-पुराणांत ज्यांचे गायन, तेच हे ब्रह्माबाबा
पवित्र संकल्पसृष्टी रचली, पावन केले मानवा ।।२।।

नंदीगणाच्या रूपांत, जयाची खूण पटते शिवमंदिरी
शिवपित्याच्या कार्यात झोकले, काही न ठेवता ऊरी ।।३।।

तेच हे ब्रह्माबाबा, भगीरथ जयास म्हणती
भाग्य उजळाया, ज्ञानगंगा आणली भूमीवरती ।।४।।

तेच हे ब्रह्माबाबा, दिव्यत्वाने केला नाश दुर्गुणांचा
योगशक्तीने नष्ट केला, डोंगर जन्मांतरीच्या पापांचा ।।५।।

तेच हे ब्रह्माबाबा, श्रीकृष्णाचे जणू अवतार
गीताज्ञानाची मुरली ऐकवून, करिती नौका पार ।।६।।

तेच हे ब्रह्माबाबा, गुप्तरूपी प्रभुसंदेश आणिती
ऊठा प्रिय मुलांनो! कलियुगाची घटिका भरली ।।७।।

तेच हे ब्रह्माबाबा, जयाने भेट घडविली जीवा-शिवाची
दुःखधाम हे नसे आपुले, दुनिया ही रावणाची ।।८।।

तेच हे ब्रह्माबाबा, चतुरानन त्यांची मूर्ती शोभते
चारही युगांचे ज्ञान देऊन, अंतर्मुखी बनवले ।।९।।

तेच हे ब्रह्माबाबा, सत्यतेचा मार्ग दाखवी
वासना त्यागाचा, अद्भुत ज्ञानमार्ग दावी ।।१०।।

तेच हे ब्रह्माबाबा, शिव परमात्म्याचा रथ बनुनी
महान तपस्वी बनले, धन कांचन त्यजूनि ।।११।।

तेच हे ब्रह्माबाबा, शास्त्रसार ऐकवी
ज्ञानयोग शिकवूनि, मानवास देव बनवी ।।१२।।

तेच हे ब्रह्माबाबा, तन-मन-धन वाहिले प्रभुचरणी
विश्वस्त बनूनी, शिकवी निरीच्छ जीवन अन् करणी ।।१३।।

तेच हे ब्रह्माबाबा, सर्वधर्मसमभावाचा मंत्र शिकविला
वसुधैव कुटुम्बकमच्या सूत्रात, सर्वांना गुंफियले ।।१४।।

तेच हे ब्रह्माबाबा, आबूपर्वतावर अवतरले
श्रेष्ठ ज्ञान शिकवूनि, मानवास महान बनवले ।।१५।।

तेच हे ब्रह्माबाबा, शांतीचा महामंत्र दिला
दुःख क्लेश मालवून, शांत धर्म जागविला ।।१६।।

तेच हे ब्रह्माबाबा, प्रभू अवतरणाचा ध्वज फडकविला
सत्यपथावर चालून, आत्मनिर्भरतेचा दीप जागविला ।।१७।।

तेच हे ब्रह्माबाबा, जीवनपरिवर्तनाचा वसा घेतला
सौभाग्यशाली बनवून, ब्रह्माकुमारीचा दर्जा दिधला ।।१८।।

असा महिमा असलेल्या ब्रह्माबाबांनी अनेकानेक मनुष्यात्म्यांना सत्यपित्याच्या ज्ञानमार्गावर मार्गस्थ केले. १८ जाने. १९६९ रोजी आपला नश्वर देह त्यागून अव्यक्त झाले. अशा ब्रह्माबाबांना आमची कोट्यानुकोटी स्मृतिपुष्पे सादर अर्पित करीत आहोत.

***

## महाभारतातील यक्षप्रश्न

**प्रश्न** : कोणत्या गोष्टीचा त्याग केल्याने मनुष्य धनवान होतो?

**उत्तर** : कामवासनेचा त्याग केल्याने मनुष्य धनवान होतो.

**स्पष्टीकरण** : कामवासना म्हणजेच वैषयिक आकर्षण आणि याचे सूक्ष्म रूप म्हणजे कामना किंवा इच्छा. न तृप्त होणाऱ्या इच्छांमागे मनुष्य धावत राहतो. इच्छापूर्तीसाठी धन, वेळ, शक्ती खर्च करतो. याउलट जो कामनेवर जय मिळवतो तो या सगळ्याचा व्यय थांबवतो म्हणजेच धनवान होतो.

***



# प्रभू रंगात रंगूनी

**भाग – ३**

**ब्र. कु. मिनल, ठाणे (प.)**

**जसोदामैय्या तसंच लंडनच्या जयंती दीदींची आई रजनीमाता यांनी ईश्वरी सेवेत केलेल्या योगदानासंबंधीचे अनुभवकथन**

आपल्या उत्सवप्रिय देशात सणांना तोटा नाही. तरीही लहान–मोठे, श्रीमंत–गरीब, सर्व धर्माचे भारतीय दिवाळीची अगदी उत्सुकतेने वाट पाहत असतात. घराची स्वच्छता, फराळाचे पदार्थ, सुगंधी तेल–उटणं लावून केलेलं अभ्यंगस्नान, आकाशकंदील आणि पणत्यांनी उजळून गेलेला आसमंत. नवचैतन्य जागवणारा हा दिव्यांचा उत्सव. यंदा बऱ्याच वर्षांनी आपण प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी केली.

आध्यात्मिक दृष्टीने पाहताही याचे मोठे महत्त्व आहे. दीपराज परमात्मा शिवबाबांशी मन, बुद्धी जोडून स्वत:बरोबरच अनेकांची आत्मज्योत तेजोमय करणारा, २१ जन्मांसाठी अविनाशी पवित्रता, सुख–शांतीची प्राप्ती करविणारा दीपावलीचा सण सृष्टीनाटकात विशेष महत्त्व राखून आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचा हा स्थापना दिन. कलियुगी मानवातील नरकासूर अर्थात षड्रिपूंचा नाश करून सुंदर, स्वर्गीय पहाट उजाडण्यासाठी निराकार शिव परमात्म्याने ज्ञानज्योत चेतवली, त्याला आता ८४ वर्षं पूर्ण होत आहेत. त्यांचं साकार माध्यम बनलेल्या ब्रह्माबाबांनी तन–मन–धनाबरोबरच जन म्हणजेच संबंध–संपर्कातील व्यक्तींद्वारेही सर्वोच्च ईश्वरी सेवेचा आदर्श घालून दिला. इंग्रजीत एक म्हण आहे 'charity begins at home' स्वगृहापासून दानारंभ करावा. दादा लेखराज कृपलानी अर्थात् ब्रह्माबाबांचं सिंध हैद्राबादमध्ये मोठं कुटुंब होतं. विसाव्या शतकाच्या आरंभीचा तो काळ. त्यांच्या वहिनींना (मोठ्या भावाची पत्नी) कुटुंबप्रमुख म्हणून सगळे मान देत असत. त्यांच्याच नात्यातील 'जसोदा' नावाच्या कन्येशी दादा लेखराजांचा विवाह संपन्न झाला. काळ पुढे सरकला तशी दादांची भरभराट झाली. आपल्या गृहलक्ष्मीला ते खरोखरच देवी मानून त्यांच्या शब्दाला मान देत असत. जसोदा माता मुळातच सुसंस्कृत, सालस होत्या. एकीकडे राजा महाराजांच्या दरबारात ऊठबस असलेल्या दादांची सामाजिक जीवनातील पत प्रतिष्ठा सांभाळताना, पावित्र्य राखून व्रतवैकल्य करणं यावरून त्यांची भक्ती किती उच्च कोटीची होती हे समजतं.

शिवबाबांनी दादा लेखराजांना विश्व परिवर्तनासाठी निमित्त माध्यम बनवणं, 'अल्फ को अल्लाह मिला..' म्हणत मौलाई मस्तीने दादांनी व्यवसायाचा निरोप घेणं, दिवसरात्र ईश्वर चिंतनात मग्न राहणं, प्रियजनांना आत्मा रूपात पाहण्याचा अभ्यास करणं. या सगळ्या घटनाक्रमाचा एक पत्नी, आई, आजी म्हणून जसोदा मातांच्या दृष्टीने विचार केला तर काय जाणवतं? नक्कीच त्यांच्यावर तेव्हा मोठी जबाबदारी आली असणार. पण पतीच्या ठिकाणी (दादा लेखराज) आपले आराध्य दैवत असलेल्या श्रीकृष्णाचा साक्षात्कार झाल्यावर त्यांचेही आयुष्य बदलून गेले. परमपिता शिवबाबांचा सत्य परिचय मिळाल्यावर या निश्चयापासून त्यांना कुणीही परावृत्त करू शकलं नाही. नि:स्पृहपणे त्यांनी केलेला दागिने व संपत्तीचा त्याग त्यांचं मोठेपण अधोरेखित करत असला तरी कुटुंबातील

लेकी-सुनांनाही (दादी निर्मलशांता, बृजेन्द्रा दादी, संतरी दादी) ईश्वरी कार्यात पूर्ण स्वाहा करणं, हे त्या काळाचा विचार करता विशेष होतं. 'राधा' ही जसोदामातांच्या माहेरच्या नात्यातील कन्या पुढील काळात यज्ञमाता जगदंबा सरस्वती 'मम्मा' म्हणून ओळखल्या गेल्या. त्या कन्येविषयी जसोदामातांनीच सर्वप्रथम बाबांना सांगितले होते.

पर्णफुटीच्या झाडाला जशी पाने आणि त्यातून नव्या फांद्या फुटत राहतात तसं मम्मांच्या सान्निध्याचा रंग दादी जानकीजींना मिळाला. त्यातून पुढे काय घडलं पहा.

आज युरोप खंडातील ब्रह्माकुमारीजच्या सेवाकेंद्रांच्या निमित्त संचालिका असलेल्या जयंती दीदी यासुद्धा 'कृपलानी' कुटुंबातीलच एक सदस्य आहेत. १९५७ मध्ये पुण्याला राहत असताना त्यांच्या आई 'रजनी माता' जानकी दादींच्याद्वारे ज्ञानमार्गात आल्या. यासंदर्भात दादींना प्रेरणा देणाऱ्या होत्या खुद्द 'मम्मा'. पवित्र जीवन जगणं हा ईश्वरी ज्ञानमार्गाचा पाया आहे. रजनीमातांनी मम्मांना विचारलं, **''शिवबाबा कामविकारावर विजय मिळवण्याची प्रेरणा देतात. क्रोध, लोभ, मोह असे इतरही विकार आहेत, त्याविषयी का सांगत नाहीत?'' यावर मम्मांनी फार छान उत्तर दिलं, ''कामवासना सर्व विकारांचा कमांडर आहे. युद्धात शत्रूसैन्याच्या कमांडरला जिंकून घेतलं तर आपोआपच सगळं सैन्य शरण येतं.**'' रजनीमातांनी पूर्ण निश्चयाने पवित्रतेच्या धारणेचं व्रत घेतलं. शुध्द सात्त्विक भोजनाबरोबरच साधं राहणीमान स्वीकारलं. ज्ञान-योगाचं आकर्षण वाढतंच गेलं. इतकं की लंडनला स्थायिक झाल्यावरही अमृतवेळेचा योग, भारतातून येणाऱ्या मुरलीचे वाचन-मनन, बाबांना भोग लावणं. पुरुषोत्तम संगमयुगी दिनचर्या अखंड सुरू राहिली. विशेष म्हणजे १९६० च्या आसपास तेव्हा विदेशात एकही सेवाकेंद्र नव्हतं. दोन मुलांसह कुटुंबाची जबाबदारी पेलतानाही रजनीमातांनी स्वत:च्या तीव्र पुरुषार्थाद्वारे विदेशातील ईश्वरी सेवेचा पाया रचला असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. सुरूवातीला पती 'मुरली दादा' ज्ञानमार्गावर चालत नव्हते; पण रजनीमातांचा नम्रपणा, सहनशक्ती, शांत स्वभाव, खरेपणा. यामुळे प्रभावित होऊन ते पूर्ण सहकार्य देत राहिले. ब्रह्माबाबांविषयी त्यांच्या मनांत अपार स्नेह आणि सन्मान होता.

१९६५ साली मम्मांनी देह त्यागला नंतर १९६९मध्ये साकार बाबांनी (ब्रह्माबाबांनी) देह ठेवला. तोपर्यंत ब्रह्माकुमारी संस्थेच्या काही शाखा भारतात उघडल्या होत्या; पण देशाबाहेर एकही शाखा नव्हती.

१९७१ साली अव्यक्त बापदादांनी ब्र. कु. जगदीश भाईजी, रमेश भाईजी, उषा बहनजी, रोझी बहनजी आणि इतर काही ब्रह्मावत्सांना परदेशातील सेवारंभाच्या दृष्टीने लंडन-अमेरिकेच्या दौऱ्यावर पाठवलं. तेव्हा परदेशातील पहिलं सेवाकेंद्र लंडनला उघडण्याचं ठरलं. तेथील १२ ब्रह्मावत्सांनी प्रत्येकी ५ - ५ पौंड दिले आणि ६० पौंडांमध्ये एका छोट्याशा घरात लंडन सेवाकेंद्र सुरू झालं. रजनीमाता यासाठी निमित्त बनल्या. लंडनमध्ये राहत असूनही त्यांनी मधुबन महायज्ञाची खूप सेवा केली. १९६४ मध्ये भारतात येऊन बाबांना भेटून परत गेल्यावर त्यांनी एक टेप रेकॉर्डर मधुबनला पाठवला, तो पाहून बाबांनी त्यांची खूप वाहवा केली. साकार बाबा म्हणत असत, ''यह टेप रेकॉर्डर मेरा मुरब्बी बच्चा है ।'' आज अनेकांना ब्रह्माकुमारीज संस्थेची ओळख 'ओम शांती' अशीही आहे. रजनी मातांनी हे साकार बाबांना कसं सुचवलं याविषयी जानकी दादी सांगतात, ''कराचीला असताना आम्ही ब्रह्मावत्स भेटल्यावर एकमेकांना 'मन्मनाभव' म्हणत असू. १९५० ला आबूला आल्यावर शांततेच्या स्वधर्मात राहून मंद स्मित करत असू; पण सेवेसाठी बाहेर पडल्यावर कुणी 'राम राम', कुणी 'हरि ॐ' कुणी अजून काही म्हणत असत. आपण काय म्हणावं हे समजत नव्हतं. रजनीबहन तेव्हा ज्ञानात नवीनच होत्या. बाबांना भेटल्यावर त्यांनी सुचवलं, बाबा आपण 'ॐ शांती' म्हटलं तर कसं वाटेल? बाबांना ते फारच

**(पान क्र. १६ वर)**



# चिंतन

## गंगोदक : २

**ब्र.कु मीना, ठाणे (प.)**

महाभारतातील भीष्मपितामह गंगेचे पुत्र मानले आहेत. जर साक्षात् गंगा पतितपावनी असती आणि खरोखरीच पितामह गंगापुत्र असते तर त्यांच्या ठायी गंगेसमान पावन बनवण्याची क्षमता दिसली असती. भीष्मांच्या अंगी जर तसे सामर्थ्य असते तर ते द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी गप्प बसले नसते. अर्थात् आपण जाणतो महाभारत हे एक महाकाव्य आहे, तो इतिहास नाही. त्यामुळे या गोष्टीतले तात्पर्य विचारात घेणे महत्त्वाचे. इथे मुद्दा आहे पाण्याला पावक म्हणून मानले गेलेय त्याविषयीचा.

पाणी जर पावन करणारे असते तर त्या पाण्यातील जीवात्म्यांना कधीच गती-सद्गती मिळाली असती. त्यांचाही उद्धार झाला असता. मात्र तसे घडत नाही. भारतीय घटनेनुसार 'पर्यावरण संरक्षणाबाबत एक कायदा लागू केला आहे. या कायद्यांतर्गत जलस्रोतांचे होणारे नुकसान याबाबत बरीच चर्चा केली गेली आहे. अनेक उद्योगधंदे, सर्वसामान्य वापर व त्याद्वारे होणारे प्रदूषण हा चिंतेचा विषय आहे. भारत सरकार नद्यांच्या शुद्धीकरणासाठी अनेक प्रयत्न करीत आहे. जागतिक बँकेकडून त्यासाठी लाखो डॉलर्सचे अर्थसहाय्य घेतले जात आहे. जर मानवाला पाण्याच्या शुद्धीसाठी इतके प्रयत्न करावे लागतात, तर मग ते पाणी आत्म्यांना कसे काय शुद्ध करू शकेल हा चिंतनाचा विषय आहे.

तुकाराम महाराजांनी म्हटले आहे -

> जाउनिया तीर्था काय तुवा केले?
> चर्म प्रक्षाळिले वरी वरी
> अंतरीचे शुद्ध कासयानें जाले
> भूषण त्वां केले आपणया

स्थूल रूपांत सागराला नदीचा पिता व पतीही मानले गेले आहे. म्हणून सागराचे एक नांव सरित्पती आहे. नदी ज्या प्रांतातून जाते त्या प्रांताला समृद्ध करत जाते म्हणून कदाचित् आपण नदीला देवी किंवा आईच्या रूपांत पाहिले आहे. गंगेसारख्या नदीत स्नान करण्याची कृती फक्त एक कर्मकांडाचा भाग असावा. प्रत्यक्षात यामागे काही वेगळाच आध्यात्मिक भाव असावा असा या ऊहापोहातून निष्कर्ष निघू शकतो. **ईश्वरी ज्ञानाला पाण्यासारखे पावक म्हटले आहे. पाणी स्थूल रूपातील शुद्धी करते तर ज्ञान सूक्ष्मरूपातील शुद्धी करते. परमेश्वर जसा गुणांचा सागर आहे तसा ज्ञानाचाही सागर आहे. शिवाच्या पिंडीला संतत जलाभिषेक करतात कारण तो ज्ञानसागर आहे, याचे ते द्योतक आहे. परमात्मा शिवाकडून ज्ञान प्राप्त करून ते स्वत:च्या जीवनांत धारण केले तर आपले जीवन नदीप्रमाणे समृद्ध होऊ शकते.** तद्वत ज्याने ज्ञानरूपी पाणी जीवनांत धारण करून गुणरूपी संपदा आत्मसात केली आहे तो नदीप्रमाणे इतरांनाही समृद्ध करू शकतो. अशा ज्ञानसागराकडून ज्ञान प्राप्त करणे म्हणजे स्वतः नदीसमान बनणे आणि इतरांना आपल्यातील गुणांद्वारे समृद्ध करणे हाच मन-बुद्धीस पटणारा अर्थ निघतो. पावन बनण्याकरिता ज्ञानरूपी पाण्याचीच आवश्यकता आहे नदीचे पाणी नव्हें.

***



# शिव अवतरणाच्या आदीद्रष्ट्या – दादी बृजेन्द्राजी!

**ब्र. कु. हेमंत, शांतिवन, आबूरोड**

सिंध हैद्राबाद येथे सन १८७६ मध्ये १५ डिसेंबर रोजी कृपलानी कुळाच्या वैष्णव कुटुंबात एका युगपुरुषाने जन्म घेतला. त्या महान विभूतीचे नाव होते दादा लेखराज, त्यांना सर्वजण मोठ्या प्रेमाने 'लखी बाबू' ह्या नावाने संबोधत. ते एक व्यवहारकुशल, धर्मपरायण, हिरे-जव्हाराचे नामीग्रामी व्यापारी होते. समाजात त्यांची भरपूर प्रतिष्ठा, राजा-महाराजांमध्ये मोठा मान सन्मान होता. गोरगरिबांना मोकळ्या हाताने दान देणारे दानवीर दादा लेखराज, स्वभावतःच सहृदय समाजसेवक होते. बाळ गोपाळांच्या गोकुळासारखं, धन-धान्याने भरलेलं घरदार, सुख शांतीनं बहरलेलं स्वर्गासारखं, सुखी कुटुंब होतं दादांचं. धर्मपत्नी जशोदा, जेष्ठ पुत्र किशन व पुत्रवधू राधिका (दादी बृजइंद्राजी), कलावती, पार्वती(दादी निर्मलशांताजी), पुट्टू (नवनिधी) व सूर्या ह्या चार सुपुत्री आणि कनिष्ठ पुत्र नारायण ह्या सर्व जीवलग आप्तेष्टांसोबत दादा सात्त्विक जीवनाचा आनंद घेत होते. जीवनात कोणत्याही गोष्टीची कमतरता नव्हती, परंतु सांसारिक विपुल वैभवांमध्ये राहूनही ते अनासक्त होऊन धर्म-कर्मात व्यग्र राहत. श्री नारायणाच्या परमभक्ताची भक्ती अशी उच्च कोटीची होती की ते गीतापाठ केल्याशिवाय पाण्याचा थेंबही ग्रहण करत नसत. त्यांच्या जीवनाचे एकमेव लक्ष्य होतं- 'ईश्वरप्राप्ती' आणि ह्या लक्ष्यपूर्तीच्या उद्देशापोटीच त्यांनी बारा गुरूही केले होते. त्यांची गुरूभक्ती अशी महान होती की, गुरूच्या आगमनापूर्वी गुरूभक्तीच्या भावनेने ते स्वतःच शौचालय (संडास) ही स्वच्छ करत व गुरूच्या आदेशास ते काळाची आज्ञा मानत.

एके दिवशी विश्व इतिहासात एक महान घटना घडली. दादांच्या अंगणात गुरू लालजी मोहन प्रवचन करत होते. तेव्हा भरलेल्या सभेतून दादा अचानक उठले. तसे ते कधीही गुरूची अवज्ञा करत नसत, ना मधेच सभेतून उठत, म्हणून 'ते सभेतून का उठले असावेत?' हे जाणण्यासाठी जसोदा माताही त्यांच्या पाठोपाठ गेल्या. तेव्हा मोठ्या सुनबाई राधिकाही सासूच्या मागे मागे गेल्या. जेव्हा दादांच्या खोलीत राधिका पोहोचल्या तेव्हा तेथील अद्भुत दृश्य पाहून क्षणभर थक्क होऊन पाहतच राहिल्या. दादांच्या मस्तकावर दिव्य तेज चमकत होतं, डोळे लाल-लाल झाले होते. नेत्रांमधून लाल प्रकाश पसरत होता व सम्पूर्ण कक्ष त्या तांबड्या उजेडानं भरुन निघाला होता...आणि तेवढ्यात काय चमत्कार! दादांच्या मुखकमलाद्वारे शब्द बाहेर पडले, ''निजानंद स्वरूपम् शिवोहम् शिवोहम्, निज्ज्ञान स्वरूपम् शिवोहम शिवोहम्, निज् प्रकाश स्वरूपम् शिवोहम शिवोहम्'' क्षणभरात दादा त्या अलौकिक अवस्थेतून बाहेर आले आणि राधिकेनं दादांना विचारलं, ''बाबा, काय झालं?'' तेव्हा ते फक्त एवढच बोलले, ''ती एक लाईट होती, ती एक माईट होती.'' आणि दादा त्या अलौकिक अनुभवाने गद्‌गद् होऊन गुरूपाशी येऊन वर्णन करू लागले, तेव्हा गुरू म्हणाले, ''दादा तुमच्यावर ईश्वराची कृपा झाली.'' खरंतर दादांच्या नरदेहात स्वतः निराकार शिव परमात्म्याने परकाया प्रवेश केला होता....आणि ह्या शिव अवरतणाच्या फक्त आणि फक्त राधिकाच साक्षीदार झाल्या होत्या. कल्पाच्या कहाणीमध्ये, राधिकाजीच अशा अद्वितीय पदमापदम सौभाग्यशाली अनमोल, प्रभू रत्न होत्या.

त्यांनी ब्रह्माबाबांच्या भगीरथात (भाग्यशाली देहरूपी रथात) प्रकटलेल्या प्रभूस स्वतःच्या नेत्रांनी न्याहाळण्याचे भाग्य प्राप्त केले व पूर्ण कल्पात प्रथम परमात्म मिलनाच्या पहिल्या द्रष्ट्या बनल्या. खरोखरंच त्यांची पूर्वजन्माची किती मोठी पुण्याई असावी ! पुण्यफलाने त्या शिव अवतरणाच्या आदीद्रष्ट्या सिद्ध झाल्या.

सिंध हैद्राबाद येथील कुलीन कुटुंबात जन्मलेल्या राधिकाजींचे वडील विख्यात व्यापारी होते. एकदा दादा लेखराज यांनी राधिकेला एका दुकानात मिठाई विकत घेताना पाहिले. डोक्यावर सुंदर टोपी घालून सजलेल्या राधिकेला त्यांनी मनांतल्या मनांतच जेष्ठ पुत्र किशनसाठी पुत्रवधूच्या रूपात पसंत केले. जेव्हा राधिका मोठी झाली, तेव्हा राधिकेच्या मोठ्या भावाकडे सुनेच्या रूपात हात मागितला. तेव्हा भावाने तीन अटी घातल्या, १) राधिकेचे पाय गालिचाच्याखाली कधीही पडणार नाहीत, २) त्या कधीही स्वयंपाक करणार नाहीत, ३) त्यांच्या येण्या-जाण्यासाठी गाडी (कार)ची व्यवस्था असेल. त्यासाठी त्यांचा भाऊ कोलकाता येथे आला, तेव्हा घरात गाडी, नोकर चाकर, नोकराणी सर्व काही होते. दादांनी त्यांना हिरे, माणीक, मोत्याचा खजिना स्वतः दाखविला. विविध स्वर्ण आभूषणांनी गच्च भरलेली कपाटं पाहून भाऊ दंग झाला. बुद्धिवान भावासाठी एवढा इशारा पुरे होता. दादांचे धन-दौलत पाहून तो संतुष्ट होऊन हैद्राबादला परतला व पूर्ण परिवारास सर्व समाचार सांगितला. अशा प्रकारे युक्तीने भावाच्या अटी पूर्ण करून दादांनी राधिकेला सुनेच्या रूपात आणून राजेशाही थाटात ठेवले. उदयपूरच्या महाराजाला जेव्हा हे माहीत झाले, तेव्हा त्यांनी दादांना सिंधला जातेवेळी पत्नी व सुनेसोबत बीकानेरला यायचे आग्रहाचे निमंत्रण दिले. तिथे पोहचल्यावर राजकुलीन महिलांपेक्षाही जास्त हिऱ्यांचा हार व रत्नजडीत आभूषणांमध्ये नटलेल्या राधिकेला पाहून राजस्त्रिया आश्चर्यचकित झाल्या व दादांचं मोठं मन व राजकुलोचित संस्कार पाहून खूप प्रभावितही झाल्या.

कालांतराने शिवपित्याने दादा लेखराज यांना 'प्रजापिता ब्रह्मा' ह्या नावाने अलंकृत केलं, तर राधिकाजींना अलौकिक नाव दिलं, 'बृजइंद्रा.' अशाप्रकारे दादी बृजइन्द्राजींचे दैवी परिवारात पदार्पण झाले. एके दिवशी जेवणाची थाळी घेऊन बाबांच्या समोर गेल्या, तेव्हा त्यांना बाबांच्या स्थानी श्रीकृष्णाचा साक्षात्कार झाला आणि मग त्यांना मौलाई मस्ती चढली. असा नारायणी नशा चढला की त्यांना जणू काही सासऱ्याच्या रूपात स्वतः भगवंतच भेटले. त्या वेळेस हे ज्ञान नव्हते की दादा लेखराज यांना पाहून साक्षात्कार का होतोय? परंतु शिवपित्याने हळूहळू हे रहस्य स्पष्ट केले की कर्ताकरविता स्वतः तोच परमात्मा आहे, तेव्हा त्यांच्या जीवनात नवीन अध्याय सुरू झाला. थोड्या दिवसांनंतर त्यांना चतुर्भुज विष्णूचा साक्षात्कारही झाला. ह्या अलौकिक घटनांनी त्या पूर्णपणे बदलून गेल्या व आत्मिक रंगात रंगू लागल्या. **एके दिवशी मातेश्वरीजींसोबत फिरत असताना सरकारी अधिकारी आले व त्यांनी बाबांकडे विचारपूस केली की ह्या कन्या, माता, भगिनी सर्व काही सोडून येथे का येतात? तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, 'मी त्यांना इथे दागदागिने कपडेलत्ते काहीच देत नाही, परंतु त्या तर ईश्वरी आकर्षणामुळे इथे येतात.' हा संवाद बृजइंद्रा दादींनी ऐकताच, क्षणभरही मागचा पुढचा कसलाच विचार न करता, दादींनी दागदागिन्यांचा त्याग केला आणि त्या त्यागाचे त्यांनी कधीही वर्णन केले नाही. त्यागाचाही त्याग करुन, प्रथम त्यागी तपस्वी बनून सर्वांसमोर आदर्श मांडला.**

ईश्वर अवतरणाच्या आदी द्रष्ट्या दादी बृजइंद्राजी यथा नाव तथा गुणाच्या अनुसार दैवी गुण आणि पवित्रतेच्या धारणेत ब्रज म्हणजे व्रजासमान मजबूत होत्या, तपस्येच्या बळाने त्या इंद्रासमान फरिश्ता (देवदूत) बनल्या. त्यांचे आदर्श जीवन म्हणजे इतरांसाठी दिव्य दर्पणच होते. ब्रह्माबाबांच्या लौकिक जीवनाचे अलौकिक जीवनात झालेल्या महापरिवर्तनाच्या साक्षीदार असलेल्या दादीजी, स्वतःच्या डोळ्यांनी बघितलेला इतिहास रोचकपणे, मोठ्या

रमणीकतेने हूबेहूब वर्णन करण्यात खूप पारंगत होत्या. यज्ञाच्या सुरूवातीला अनेक आव्हानांना तोंड देत, त्या अथक होऊन प्रत्येक स्थूल-सूक्ष्म सेवा करत राहिल्या. दादींनी त्यावेळेस बसही चालविली. एकदा बसचा अपघात झाला. परदेशात ही बातमी गेली, भारतात एवढी जागृती झालीय की तिथे महिलाही बस चालवतात. १९५३ मध्ये बाबांच्या आदेशानुसार त्या मुंबई येथे सेवेसाठी गेल्या व मायावी नगरीत नाना कष्ट सहन केले. जिथे तीन पाऊल पृथ्वी प्राप्त करणे जवळ जवळ असम्भवच होतं, तिथे त्यांनी कठीण परिस्थितींमध्ये सेवेची पाळेमुळे रुजविण्यास हातभार लावला. सुरूवातीला रूंगठा हाऊस, कोठारी मैदान, दिव्यांत्र, अमीचंद मेंन्शन, वाटरलू मेन्शन इत्यादी ठिकाणी सेवा केली. त्यावेळी दक्षिण मुंबईबरोबर उत्तर मुंबईमध्ये ही दैवी बाग फुलत गेली. परिणामी सायन येथे नरोत्तम निवासमध्ये सेवेसाठी स्थानही मिळाले. तेथून मुंबई, पुणे आणि महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सेवा होऊ लागली. त्यातून महाराष्ट्र व आंध्रप्रदेश मिळून झोन निर्माण झाले. त्याचे संचालक दादीजींनी स्वतः केले.

महाराष्ट्र झोन विद्यमान संचालिका संतोष दीदीजी दादींच्या सानिध्याचे अनुभव सांगतात,''दादी ब्रह्माबाबांप्रमाणेच खूप रॉयल (सभ्य आणि शालीनता सम्पन्न) व उदार ह्रदयाच्या स्वामीनी होत्या. त्या ब्रह्माबाबांच्या पावलावर पाऊल ठेवून वागल्या, जणू त्या बाबांच्या हूबेहूब झेरॉक्स कॉपी होत्या. बोले तैसा चाले...त्यांची कथनी आणि करनी (कर्म) एकसमान होती. कर्नाटक आणि आंध्रप्रदेशहून मधुबन (आबू) ला येणारी-जाणारी मंडळी मुंबईमार्गे येत-जात, तेव्हा दादींना हमखास भेटायला यायची. तेव्हा दादी मोठ्या मनानं त्यांचे आदरातिथ्य करुन आपलेपणाची अनुभूती करवित असत. एकदा मधुबनहून परतताना एक कर्नाटकची पार्टी मुंबईमार्गे परत जात होती. तेव्हा उत्सुकतेपोटी ते दादींना भेटायला आले आणि दादींच्या एका लहान सहयोगी बहिणीला (ब्राह्मणीला) म्हणाले, 'आम्हाला बाबांच्या सुनेला भेटायचंय!' त्या बहिणीने दादींना येऊन तसे सांगितले तेव्हा दादी तिला म्हणाल्या, 'उनको बताओ दादा की बहु मर गई' दादींचे उत्तर न समजल्यामुळे ती बहीण तिथे तशीच उभी राहिली. तेव्हा दादी पुन्हा म्हणाल्या, 'त्यांना सांग, बाबांची सून कधीच मेली!' मग नंतर दादी स्वतःच जाऊन म्हणाल्या, 'जिस दिन मैं ब्रह्माबाबाकी अलौकिक बेटी बनी, उसी दिन बहु तो जीते जी मर गई'(दादींचा आशय होता की 'राधिका' जी दादा लेखराज यांची सून होती, ती ज्ञानात आल्या आल्या जिवंतपणीच मेली अर्थात् राधिका जिवंतपणीच बदलून ब्रह्माबाबांची मानसपुत्री ब्रह्माकुमारी बृजइंद्रा दादी बनल्या.) खरोखरच दादींना नवीन द्विज (ब्राह्मण व पक्षी हे दोन्ही द्विज म्हणजे दोनदा जन्मणारे होत) म्हणजे अलौकिक ब्राह्मण जन्माचा खूपच नशा होता.

दादी साधेपणाच्या मूर्तिमंत अवतार होत्या. मुंबईत सेवेला इकडे तिकडे जाताना त्या कार न वापरता लोकल ट्रेननेच (रेलवेने) प्रवास करीत. कुणी भाऊ ऑफिसमधून पेन, पिन किंवा स्टेशनरी घेऊन येत असे, तेव्हा त्या म्हणत, ''ऑफिसची वस्तू आणताच कशाला?'' जेव्हा तो भाऊ म्हणत असे की, ''बॉस आणि सर्वजणही घेऊन जातात. मी आणले तर त्यात वावगे काय?'' तेव्हा दादी म्हणत, ''त्यांना चोरी करताना पाहून आपणही चोरी करू नये, कारण ते कलियुगी आहेत आणि आपण मात्र संगमयुगी आहोत ! बाबा नेहमी श्रीमत देतात की, ''कख का चोर सो लख का चोर!'' अशा प्रकारे बाबांनी दिलेली शिकवण दादी पक्क्या करीत.

खरे तर 'न भूतो न भविष्यती' असे भव्यदिव्य व्यक्तित्व होतं बृजइंद्रा दादींचं! दादी म्हणजे निर्मोही आणि निर्लोभी स्थितीचे उदाहरण होत्या. लौकिकमध्ये त्यांना दोन पुत्ररत्ने प्राप्त होती. मोठा मुलगा कराची येथे चेचक (देवी/स्मॉलपॉक्स) च्या आजाराने देवाघरी गेला. लहान मुलगा होता 'घनश्याम', त्याला प्रेमाने सर्व 'घनसी' म्हणत. दादा नारायण त्याला शिक्षणासाठी मुंबईला घेऊन आले होते. दादी व ब्रह्माबाबांचे घनश्यामवर

अतिशय प्रेम होतं. रविवारी दादी त्याला भेटायला जात. ३५ वर्षाच्या वयापर्यंत अविवाहित राहून त्याने योगी जीवन व्यतित केले. अचानक त्यालाही चेचक (देवी/स्मॉलपॉक्स) चा आजार झाला. तो ध्यानावस्थेत जात असे. दादी त्याला विचारत, ''घनसी भूक लागली का?'' तेव्हा तो म्हणे,''मला बाबांनी सूक्ष्मवतनमध्ये अमृतरस पाजला. त्याने माझं पोट भरलंय.'' आजारपणात तो बाबांची खूप आठवण करीत असे. बाबा भेटायला गेले, तेव्हा बाबांच्या कुशीत गेला. त्याचा अंतिम क्षण जवळ येताना पाहून डॉक्टर म्हणाले, ''ज्यांना कुणाला तुम्हाला बोलवायचे असेल, त्यांना बोलवा, तुम्ही ह्याच्या कोण आहात?'' तेव्हा दादी म्हणाल्या, ''आई!'' परंतु दादींच्या चेहऱ्यावर कसलेच दुःखाचे चिन्ह न पाहून डॉक्टरांनाही घोर आश्चर्य वाटले. घनसीच्या पार्थिव शरीराचा अंतिम संस्कार केल्यानंतर दादींनी समाचार सांगून बाबांना विचारले, ''बाबा, मला घनसीच्या देहत्यागाच्या वेळी, आनंदाच्या झुलुकीचा अनुभव का झाला?'' तेव्हा बाबा म्हणाले, ''तो आत्मा चांगली प्राप्ती करुन गेला.'' खरंच बृजइंद्रा दादीजी 'नष्टमोहा स्थितिच्या' चैतन्य दीपस्तंभच होत्या! कुणी खणखणीत वैरागी होऊन त्याग-तपस्येच्या पथावर चालायला शिकावे तर ते त्यांच्या आदर्श आचरणानेच!

मुंबई सायन सेवाकेंद्राचे नितीन भाई दादींच्या अमूल्य पालनपोषणाचा अनुभव अशा प्रकारे सांगतात- 'सुरूवातीला लौकिक नातेवाईकांनी माझ्या खूप परीक्षा घेतल्या. एके दिवशी घरचे म्हणाले,'घरातून चालता हो, परंतु घरातून काहीसुध्दा नेऊ नकोस.' तेव्हा मी येऊन दादींना सारे सांगितले. दादी म्हणाल्या, 'काही चिंता करु नकोस. बाबांचे घर आहे ना!' दादींनी गरजेच्या वस्तू व सामान विकत घेण्यासाठी पैसे दिले. दिवसभर सेंटरवर सेवा केल्यावर रात्री वासुभाई नावाच्या एका कुमाराकडे पाठविले. त्या कालावधीमधे काही दिवसात मोठ्या भावाचे लग्न होणार होते. तेव्हा आई वडिलांना वाटले की लहान भावाबाबत नातेवाईक विचारपूस करतील, तेव्हा लोकलाजेखातर दादींना फोन करून विचारले, 'नितिन कुठे आहे?' तेव्हा दादी म्हणाल्या, 'तो सेंटरवरच आहे. तो घरी यायचे म्हणतो, परंतु तुम्हीच तर त्याला अडवता.' आणि दादी मला म्हणाल्या, 'घरी जा व अंगणातच उभे राहून त्यांच्यापुढे तीन अटी मांड, १) ते जेवणात कांदा लसूण घालणार नाहीत, २) सेंटरवर सेवेसाठी जाताना कधी अडथळा उभा करणार नाहीत, ३) माझ्या कमाईतून मी स्वेच्छेने यज्ञसेवा करीन. मी दादींनी सांगितल्याप्रमाणे केले. घरच्यांनी त्या सर्व अटी मान्य केल्या व मी कायमचा बंधनमुक्त झालो. दादी जेवढ्या शिस्तप्रिय होत्या, तेवढ्याच आईची ममता करणाऱ्याही होत्या, त्यांच्या वात्सल्ययुक्त प्रेमळ पालनेचे वर्णन करावे तितके थोडेच आहे.

शिवबाबांनी दादींच्याविषयी महावाक्य उच्चारण केले होते, 'बच्ची ब्रह्माबाबांच्या आत्म्याच्या समीप संबंधात वेगवेगळया नावारूपाने जन्मोंजन्मी नातेवाईक बनून येत राहिली. म्हणूनच अंतिम जन्मातही दादींनी दादा लेखराज यांच्या आदर्श सून आणि प्रजापिता ब्रह्माबाबांच्या आदर्श मानस पुत्रीचे कर्तव्य कुशलतापूर्वक पार पाडले. ब्रह्माबाबांशी असलेल्या अति स्नेहाच्या फलस्वरूप जणूकाही दादींनीही निर्वाणासाठी जानेवारी महिनाच निवडला. जानेवारीच्या अव्यक्त महिन्यात ब्रह्माबापसमान सम्पूर्ण कर्मातीत फरिश्ता स्थिती प्राप्त करून, अखेर दादीजी १ जानेवारी १९९० रोजी भौतिक देहाचा त्याग करून फरिश्ता बनल्या व सूक्ष्मवतनवासी ब्रह्माबाबांना भेटण्यासाठी सूक्ष्मवतनी झाल्या. अशा महान त्यागी-तपस्वी शिव अवतरणाच्या आदी द्रष्ट्या दादींना आमुचे शत्-शत् नमन......!

***



# राजयोग आणि स्वास्थ्य

**ब्र. कु. डॉ. ज्योत्स्ना, ठाणे (प.)**

सध्या संपूर्ण विश्वात कोरोना महामारीचे सावट पसरलेले आहे. प्रत्येक जण मनांत भिती बाळगून जगत आहे. परंतु अशा परिस्थितीत स्वतःचा बचाव करणे हेच प्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी सोशल डिस्टन्सिंग (साथ सोवळे), मास्क (मुखपट्टी) घालणे, सॅनिटॅयझर (निर्जन्तुक) लावणे, साबणाने वारंवार हात धुणे यासारख्या सरकारने सांगितलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. आतापर्यंत असे अनेक आजार आलेत काय आणि गेलेत काय; पण कोविड-१९ या आजाराने मात्र संपूर्ण विश्व हादरुन गेले आहे.

कोविड-१९ म्हणजेच कोरोना नावाच्या विषाणूंमुळे होणारा आजार. हा विषाणू नाकातोंडामार्फत फुप्फुसात शिरून गंभीर आजार उत्पन्न करतो. सर्दी, खोकला, ताप, जुलाब, अशक्तपणा अशी फ्लूच्या आजारासारखी काहीशी लक्षणे यात दिसतात. खोकतांना, शिंकताना द्रवबिंदूद्वारे याचा संसर्ग होऊ शकतो. म्हणूनच वरील नियमांचे पालन करून स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे.

सध्यातरी या आजारावर ना कुठले औषध आहे व ना लस परंतु स्वतःची प्रतिकारक्षमता जर चांगली असेल तर कुठलाही विषाणू आपल्याला काहीही करू शकत नाही. प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी प्रत्येक पॅथीचे प्रयत्न चालू आहेत. आयुर्वेदिक दृष्ट्या विचार करायचे झाले तर 'स्वस्थस्य स्वास्थ्यरक्षणं आतुरस्य विकारप्रशमनं च।' म्हणजेच स्वस्थ व्यक्तिच्या स्वास्थ्याचे रक्षण करणे व रोगी व्यक्तीच्या विकारांचे प्रशमन करणे हाच मुख्य उद्देश आहे.

आयुर्वेद या प्राचीन शास्त्रात जनपदोध्वंस व्याधीमध्ये या आजाराचा समावेश आहे. तसेच एकमेकांच्या वस्तू वापरू नये व शारीरिक स्वच्छतेचा उल्लेखदेखील यात आढळतो. ही व्याधी वातकफज आहे व श्वसनमार्गाद्वारे होत असल्याने श्वसनमार्गाची शुद्धी आवश्यक आहे. यासाठी आयुष मंत्रालयाद्वारे काही मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यात -

**१) नाकात खोबरेल/तीळ तेल लावणे.**

**२) खोबरेल/तीळ तेलाच्या गुळण्या करणे.**

**३) आपल्या भारतीय संस्कृतीत घराघरांत मसाल्यांचा वापर होतो. त्यांचाच वापर करून काढा करावा. दालचिनी, सुंठ, तुळशी, हळद, मनुका यांचा काढा करावा व त्यात गूळ व लिंबू आवश्यकतेनुसार टाकावे.**

**४) धातुवर्धन व बलवर्धनासाठी आवळायुक्त च्यवनप्राश, आमलकी रसायन, गुडूची घनवटी या रसायनांचा वापर करावा.**

**५) फुप्फुसाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आसने, प्राणायाम, व्यायाम देखील करावा.**

शारीरिक स्वच्छतेबरोबरच मानसिक स्वच्छता पण आवश्यक आहे कारण सतत मिडिया (प्रसार माध्यमां) द्वारे त्याच त्याच आजाराच्या बातम्या, आर्थिक मंदी, नोकरीतील अनिश्चितता त्यामुळे होणारा मनःस्ताप. या सर्वांचा परिणाम म्हणजे मनात असंख्य विचारांचे काहूर, भविष्याची चिंता व आजाराची भिती यातून जर बाहेर पडायचे असेल तर मनाला सकारात्मक चिंतनाची दिशा दाखवणे आवश्यक आहे.

परमपिता परमात्मा शिवबाबांनी आपल्याला अनेक ज्ञान मुरलींमधून हे स्पष्ट केले आहे की, 'बच्चे, ऐसा नाजुक

**(पान क्र. २१ वर)**

(ब्रह्मावत्सांकरिता)

# चित्रातून चरित्रनिर्मितीकडे

**ब्र.कु. एकता, ठाणे (प.)**

नित्य मुरलीत बाबांकडून एक वरदान आपल्याला प्राप्त होते. हे वरदान लक्षात ठेवून आचरणांत आणण्याचा प्रयत्न प्रत्येक ब्र.कु. करत असतोच. मानसशास्त्राच्या दृष्टीतून पाहिले तर चित्ररूपात एखादी गोष्ट आपल्या सहज लक्षात राहू शकते. शब्द लक्षात ठेवण्यापेक्षा चित्र लक्षात राहणे सोपे असते हे अनुभवसिद्ध आहे. म्हणूनच लहानपणी आपण अक्षरे आणि त्याला अनुसरून चित्र असे शिकत गेलो.

शिवबाबांच्या शाळेच्या सुरूवातीचा अभ्यासक्रमही साप्ताहिक पाठ्यक्रमाद्वारे चित्ररूपातच समजाविला जातो.

या पार्श्वभूमीवर नोव्हेंबर महिन्यातील एक वरदान चित्ररूपात स्पष्टीकरणासकट खाली देत आहोत.

वरदान - मायेच्या (५ विकारांच्या) रॉयल (सूक्ष्म; पण मरिचासारख्या फसव्या) रूपातील बंधनांपासून मुक्त, विश्वजीत आणि जगतजीत भव।

स्पष्टीकरण - 'माझा पुरुषार्थ, माझ्या नवनवीन कल्पना, मला जाणवणाऱ्या प्रेरणा, माझे गुण, माझी निर्णयशक्ती सगळं खूप चांगलं, श्रेष्ठ आहे' अशा विचारांचं जाळं हेसुद्धा मायेचं रॉयल रूप आहे. मायेच्या मंत्राच्या जादूमुळे तुझे तेही माझे (शिवबाबांकडून मिळालेल्या गुण - शक्तींबाबत अहंकार येणे ) वाटू लागते. याकरिता अशा अनेक बंधनातून मुक्त होऊन एक बाबांशी सर्व नाती जोडून त्यात मग्न रहा तरच मायाजीत बनू शकाल. मायाजीत व्यक्तीच प्रकृतिजीत, विश्वजीत जगतजीत बनू शकतो. अशी व्यक्तीच बाबांच्या 'एका सेकंदात अशरीरी बना' या आज्ञेचे पालन सहज आणि स्वाभाविकपणे करू शकते.

खालील चित्रात बुद्धीरूपी पाऊल, 'मी आणि माझे गुणविशेष' इत्यादीत फसलेले दाखवले आहेत. मायारूपी रावण अशा विचारांची अदृश्य; पण मजबूत श्रृंखला घालतो. मग बुद्धीचे हलके होऊन उडणे कठीण होत जाते. देहभानरूपी धरणीवरच बुद्धीरूपी पाऊल अडकून पडते. सर्व नाती शिवबाबांशी जोडली तर ही बंधने आपोआप गळून पडतील आणि सहजपणे देहभानातून आत्मा मुक्त होऊ शकतो. परिणामी आपण बाबांची आज्ञाधारक मुले विनासायास बनू शकतो.



आशा आहे, आपल्याला असे चित्ररूप आनंद देवो आणि पुरुषार्थात लाभकारकही ठरो.

***



# तमसो मा ज्योतिर्गमय...

**ब्र. कु. दिलीप राजकुळे, ज्ञानसरोवर माऊंट आबू**

अंधार म्हणजे प्रकाशाचा अभाव, अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव. त्याप्रमाणे असंस्कृत म्हणजे सुविचारांचा अभाव.

सत्य, दया, क्षमा, शांती, निर्मोही, निर्हेतुक निःस्वार्थ प्रेम ही धर्माची अंगे आहेत. 'दुर्लभ काय आहे?' असा एक प्रश्न आद्य शंकराचार्यांनी एकदा केला होता आणि स्वतःच त्यांनी उत्तर दिलं – सद्‌गुरू, सत्संग, ब्रह्मविचार ह्या तिन्ही गोष्टी एकत्र सापडणं कठीण आहे. संतांचा आशीर्वाद, सदाचरणी ब्राह्मण व्यक्तीचा सतत सहवास आणि मनांत चांगले विचार येणे, हातांनी चांगली कृती होणे, हे ईश्वर स्मरणाने शक्य होईल असे संत सांगतात.

'सत्य काय आहे?' असा प्रश्न आहे. सत्य शरीर नव्हे परंतु शरीराला चालविणारी एक चेतन शक्ती आत्मा आहे. आत्म्याच्या गुणांचा व शक्तींचा विकास करणे म्हणजे खऱ्या अर्थाने जीवनाचा उद्धार करणे होय किंवा स्वधर्माप्रमाणे चालणे होय. जो मनुष्य स्वतःला ओळखतो व स्वतःचे गुण व शक्तींचा प्रयोग दुसऱ्यांसाठी करतो तो खऱ्या अर्थाने संत आहे. जी व्यक्ती संसारात राहून तमोगुणांचा त्याग करते ती व्यक्ती म्हणजे संत होय. दुसऱ्या अर्थाने संत म्हणजे ज्याने आपल्या आचरणात, जीवनात दैवीगुण आणले. ज्याच्या मनात वसुधैव कुटुंबकम्‌ची भावना आहे व तो त्या मार्गाने आपले संकल्प, वचन आणि कर्म करतो. धर्म अर्थात् धारणा. ज्या व्यक्तीने आपल्या जीवनात दैवी गुणांची धारणा केली आहे तो खऱ्या अर्थाने धर्माचे पालन करतो. ज्याच्या मनात सदैव परोपकाराची भावना असते तोच खरा संत.

आजच्या काळात निर्व्याज प्रेम प्राप्त होणे कठीणच आहे. परंतु ज्याने स्वतःला संपूर्ण रीतीने ओळखले आहे व ज्याचे मन ईश्वरामध्ये तल्लीन झालेले आहे अशा महान व्यक्तीकडून निर्व्याज प्रेम मिळणे सौभाग्याचे चिन्ह आहे. परंतु असे संत फारच कमी असतात. कारण मनुष्य देहभानात फसलेला आहे व देहभानापासून मुक्त लाखों लोकांमधून एखादा असतो. देहभानापासून मुक्त राहून, स्वार्थापासून मुक्त राहून जे प्रेम प्राप्त होते ते सत्य प्रेम, निर्व्याज प्रेम आहे.

सद्‌गुरू, सत्संग व ब्रह्मविचार (ज्ञान) म्हणजे श्रेष्ठ विचार ह्या तिन्ही गोष्टी एकत्र सापडणं कठीण आहे. परंतु काळ चक्राप्रमाणे कलियुगाच्या अंती व सत्ययुगाच्या आरंभी अशा संगमयुगाच्या श्रेष्ठ काळात ह्या तिन्ही गोष्टी मिळतात. म्हणून ईश्वराने सांगितले आहे, 'यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मनम् सृजाम्यहम्।' **तो परमसद्‌गुरू परमात्मा येऊन सत्य ज्ञानाचा प्रकाश देतो व सांगतो सद्‌गुरू म्हणजे जो गुरूंचा देखील गुरू परम सद्‌गुरू तो म्हणजे परमपिता परमात्मा शिव आहे. तो सर्व मनुष्य आत्म्यांचा माता-पिता, बंधू, सखा, सद्‌गुरू व सर्वांचा कल्याणकारी, दिव्य ज्ञान दाता आहे आणि जर ह्या संगमयुगाच्या काळांत परमसद्‌गुरूंशी आपला बुद्धियोग जडविला तर त्यास सत्संग असे म्हणतात व अशा सत्संगाने सत्‌गुण आपणास मिळतात.** तसेच त्यांच्यात जे गुण व शक्ती असतील ती आपणांस प्राप्त होते. परमात्म्याशी बुद्धीयोग साधल्याने मन निर्मळ होते व मनांत ब्रह्मविचार अर्थात् श्रेष्ठ विचारांचा प्रवाह सातत्याने वाहत असतो व दुसऱ्यांना सुख देण्यास कारणीभूत ठरतो. याचा

अर्थ स्वतःसुद्धा संत बनतो. म्हणून संत बनण्याकरिता घरादाराचा त्याग करण्याची आवश्यकता नाही परंतु मनांत त्या सत्य पित्याची स्मृती ठेवण्याची आवश्यकता आहे व आपल्यातील षड्रिपूंचा त्याग करण्याची आवश्यकता आहे.

काळ परिवर्तन होत असतो त्याप्रमाणे व्यक्तीचे देखील परिवर्तन होत जाते. सध्याचा काळ म्हणजे अतिपापाचार, अत्याचार, भ्रष्टाचारांनी युक्त असलेला काळ आहे. त्यामुळे आपण कोणत्याही व्यक्तीला दोष देऊ शकत नाही. परंतु मनुष्य स्वतःच्या धर्मास विसरला आहे एवढं तरी म्हणू शकतो. म्हणून आपांपसांत वैरभावाचे वातावरण बनले आहे. सुरूवातीलाच म्हटल्याप्रमाणे धर्म म्हणजे दैवी गुणांची धारणा. श्रेष्ठ गुणांची, ईश्वरी शक्तीची धारणा म्हणजे धर्म होय. परंतु मनुष्य आसुरी कृत्यांनाच आपला धर्म मानून बसला आहे व आपांपसांत मारामारी व कुकृत्य करत राहतो. त्यामुळे स्वतःच्याच नव्हे परंतु कौटुंबिक, सामाजिक व देशाच्या तसेच वैश्विक शक्तींचा नाश करतो.

सत्संगाचा परिणाम माणसाच्या आचार, विचारांवर कसा होतो यासंबंधी गौतम बुद्धांची एक गोष्ट वाचनांत आली. एका स्त्रीने बुद्धदेवांना विचारलं, ''लोक सत्संग हवा असे का म्हणतात? सत्संगाचा फायदा काय?'' बुद्धदेव तिला म्हणाले, ''मी उद्या येतो, तू माझ्यासाठी खीर करून ठेव.'' दुसऱ्या दिवशी बुद्धदेव आले. येतांना एक भांडं भरून शेण घेऊन आले आणि त्या स्त्रीला म्हणाले, ''ती खीर यात ओत.'' ती स्त्री अवाक् झाली. बुद्धदेवांकडे बघतच राहिली; पण बुद्धदेवाच्या सांगण्याप्रमाणे त्या भांड्यात खीर ओतू लागली. सुरूवातीला खीर खाली पडली; पण त्याबरोबर थोडं शेणही पडले. हळूहळू भांड्यातील सर्व शेण बाहेर पडले आणि शेवटी ते भांडे स्वच्छ खिरीने भरून गेले. बुद्धदेव त्या स्त्रीला म्हणाले, ''षड्रिपूंचा नाश करावयाचा असेल तर सत्संग सतत हवा.'' सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो. संतांचा आशीर्वाद, सतत लाभणारा सत्संग, मनांत परमेश्वराचे चिंतन आणि मुखी सत्यज्ञान एवढ्या गोष्टी या कलियुगात मन सुसंस्कृत करण्यासाठी पुरेशा आहेत. त्यासाठी ईश्वरी ज्ञानाच्या प्रकाशाची आवश्यकता आहे. म्हणून एका अभंगात म्हटले आहे -

या जगी तोच पुरुष भला
त्यजीता देहा किर्ती मागे
साधया खपला।
या जगी तोच पुरुष भला।।

अज्ञान म्हणजे अंधश्रद्धा. ज्ञान म्हणजे देहभान विरहित आत्मस्थितीत राहून केलेले कर्म. ज्ञान म्हणजे ब्रह्माचा दिवस, ज्ञान म्हणजे भक्तीचे फळ. ज्ञान म्हणजे सर्व शास्त्र-वेद-पुराण यांची समज. ज्ञान म्हणजे अहंकाराचा अभाव, इच्छा मात्रम् अविद्या. ज्ञान म्हणजे मनापासून सातत्याने केलेली पवित्रतेची पराकाष्ठा. ज्ञान म्हणजे सुख-दुःख, मान-अपमान, जय-पराजय, लाभ-हानीमध्ये सदा एकरस सदा समान. दोन इंची जिभेवर नियंत्रण, ३६ प्रकारचे भोजन असो वा केवळ सुकी भाकर दोन्ही बाबतीत शांत व अत्यंत समाधानी.

ज्ञानी म्हणजे मी आत्मा व तो परमात्मा तिसरे कोणी नाही. ज्ञान-बोलणे, वाचणे, लिहिणे सोपे. ज्ञानमय जीवन बनविणे हाच खरा प्रकाश. ज्ञानाचा प्रकाश. तर चला अंधारातून खऱ्या ज्ञानाच्या प्रकाशाकडे.

***

---

**(पान क्र. ७ वरून)**

आवडलं आणि तेव्हापासून आजतागायत आपण आवर्जून 'ॐ शांती' म्हणतो.

परमात्म्याने स्थापन केलेल्या या महान यज्ञात अशी अनेक अमूल्य रत्नं आहेत, ज्यांनी charity begins at home या म्हणीनुसार ज्ञानदानाचा श्रीगणेशा आपल्याच घरापासून व्हावा असे समजून ईश्वरी ज्ञान-योगाच्या अभ्यासाने स्वत:बरोबर संपूर्ण कुटुंबाचा उद्धार केला. कालौघात कित्येकांनी नश्वर देहाचा त्याग केला असला तरी पुढील जन्मात पवित्र संस्कारांद्वारे ते नक्कीच ईश्वरी सेवेत हातभार लावत असतील यांत शंका नाही.

(संदर्भः वन्दे मातरम्)

***



# यज्ञेतिहासाची पाने चाळताना...

## साकार ब्रह्माबाबांच्या सहवासातील काही अनुभव – जानकी दादीजी

एखादी विशिष्ट इच्छा मनांत धरून तिच्या पूर्तीसाठी यज्ञ रचण्याची आपल्या देशात जुनी परंपरा आहे. यज्ञकुंड स्थापून, मंत्रोच्चारांच्या गजरात, सिद्धहस्त ब्राह्मणांकरवी समिधा अर्पण करून इष्ट देवतेला प्रसन्न करून घेतले जाते. पण या घोर कलियुगात जसजशी पापकर्मे वाढत आहेत तशी पवित्रतेची शक्ती अगदी क्षीण झाली आहे. अशावेळी मंत्रांमध्ये तरी कोठून सामर्थ्य येणार? शेवटी भक्तांच्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी त्रिमूर्ती शिव परमात्मा या सृष्टीवर अवतरित होतात. विषय विकारांनी ग्रासलेल्या, पतित झालेल्या धरेवर पवित्र सत्ययुगाची पुनर्स्थापना करण्यासाठी 'राजस्व अश्वमेध अविनाशी रुद्र गीता ज्ञान यज्ञ' रचतात. साधारण मनुष्य शरीरात प्रवेश केलेल्या ज्योतीर्बिंदू परमात्म्याला, ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्राद्वारे ओळखणारे 'पुरुषोत्तम संगमयुगी ब्राह्मण' ब्रह्माकुमार-ब्रह्माकुमारी म्हणून ओळखले जातात. आपल्या तन-मन-धनाने, शुद्ध भोजन तसेच मर्यादापूर्वक आचरणाने ते या पवित्र यज्ञाचा सांभाळ करतात. 'मन्मनाभव'-स्वतःला आत्मा समजून परमात्म्याला आठवण करतात. त्यायोगे काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार यासारख्या विकारांची आहुती पडते व योगाग्निने अपवित्रता जळून भस्म होते. सर्वत्र शांती, सुख, पवित्रतेचं मंगल वायुमंडळ निर्माण होतं. हळूहळू कलियुगाचं सत्ययुगात रूपांतर होतं. साधारण मनुष्यात्मा देवता पदाला पोचतो. या आगळ्यावेगळ्या यज्ञाची स्थापना, हळूहळू होत गेलेला विस्तार, त्यातील विस्मयकारी घटना खूप प्रेरणादायी आहेत. आदिरत्न जानकी दादी या स्थित्यंतराच्या सुरवातीपासून साक्षीदार होत्या. ब्रह्माबाबांसमवेतचे काही अनुभव त्यांच्याच शब्दांत :

माझे जन्मदाते वडील हे सिंधमधील दागिन्यांचे एक प्रतिथयश व्यापारी होते. चांगले भक्तही होते. मलाही लहानपणापासूनच ईश्वराविषयी खूप प्रेम वाटे. सिंधी सत्पुरुष दादा वासवानी यांच्या अनेक शिष्यांपैकी मीही तेव्हा एक होते. देवळात भजन करताना अगदी तल्लीन होऊन मी प्रार्थना म्हणत असे 'तुम मात पिता हम बालक तेरे.. कोई न जाने तुम्हारा अन्त, उंचे ते उंचा भगवंत..' पितृतुल्य लेखराज दादांनाही मी आधीपासून ओळखत होते. राजकुलोचीत श्रेष्ठ संस्कार असलेले 'दादा' मला फार आवडत. असंच एकदा मी माझ्या वडिलांसमवेत चालत बागेत जात असताना समोरून दादा येत होते. त्यांच्या नेत्रांत व मुखावर अद्वितीय दिव्य प्रभा विलसत असलेली मला जाणवली. मला कुठेतरी अंतरीची खूण पटली, त्या नेत्रांतील शक्ती अद्भुत होती. अशी शक्ती यापूर्वी कधी अनुभवली नव्हती. नक्की काय ते समजत नव्हतं पण वेगळेपण जाणवलं. निराकार शिव परमात्म्याने आपले साकार माध्यम म्हणून दादा लेखराजांना निवडले व त्यांचे कर्तव्यवाचक नाव 'प्रजापिता ब्रह्मा' ठेवले हे नंतर हळूहळू समजत गेले. सुरवातीला ब्रह्माबाबांच्या तनात प्रविष्ट झालेले शिवबाबा कुणाला ओळखू येत नसत; पण जेव्हा त्या मुखातून वाणी उमटत असे तेव्हा ईश्वराची उपस्थिती स्पष्ट जाणवे. दादा म्हणत असत, ''कोई करा रहा है, करावनहार करा रहा है'' त्यापूर्वी कोणत्याही भक्ताच्या तोंडून अशी भाषा मी कधी ऐकली नव्हती. जन्मजन्मांतरीची माझी भक्ती फळाला आली, परमेश्वर भेटला.

माझ्या पाठची दोन नंबरची हुशार बहीण 'लक्ष्मणा' ही माझ्या अगोदर यज्ञात सामील झाली. श्रीमंती थाट, महागडे कपडे-दागिने, संसारात रमण्याची अजिबात इच्छा नसूनही दैवयोगाने फार लवकर माझे लग्न करून देण्यात आले. दादा लेखराजांनी माझ्या वडिलांकडे याविषयी नापसंती व्यक्त केली, तेव्हाच त्यांच्याबद्धलचा माझा आदर दुणावला. वाटलं, यांना माझ्या आयुष्याची खरी काळजी आहे. सासरी कडक बंधन असूनही मी बाबांकडे सत्संगात जात असे. भक्तिमार्गात 'स्वस्तिक' या मंगल चिन्हाला फार मान आहे. बाबांनी स्वस्तिकाच्या चित्रावर ईश्वरी ज्ञान समजावून सांगितलं. विश्व लाघव अर्थात हे वैश्विक नाटक म्हणा वा ड्रामा निश्चित नोंदलेला आहे. **आत्म्यामध्ये मन-बुद्धी आणि संस्कार असतात. जसं माझं मन असेल तशी माझी बुद्धी चालेल. ज्यात मन रमेल, जसं कर्म घडेल तसेच संस्कार बनतील. आपण ईश्वराची लेकरं आहोत त्यामुळे आपले मूळ संस्कारही शुद्ध, पवित्र आहेत. देहभानाचा कोणताही संस्कार नको. साक्षीभावाने बघावं. मी ज्योतीस्वरूप आत्मा आहे व माझा शिवबाबा आहे. लौकिक जगाचा मोह किंवा कोणतही बंधन नाममात्रही शिल्लक राहू नये.** या माझ्या नश्वर देहासहित सगळे संबंध विसरून जावे, या स्पर्धेत माझा नंबर पुढे असावा असं पुरुषार्थाचं लक्ष्य असे. भलेही ब्रह्माबाबा एखाद्याला शिव परमात्म्याची ओळख देत असत, तरीही तेव्हा शिवबाबाच बोलत आहेत अशी स्पष्ट जाणीव होत असे. यज्ञातील सुरूवातीचे दिवस हे असे एकमेवाद्वितीय ईश्वरी प्रेमाने भारलेले होते.

पांडव भवनमधील चार धामांमध्ये बाबांची जी पर्णकुटी आहे तेथील दोन आठवणी माझ्या स्मृतीत कायमच्या नोंदल्या गेल्या आहेत. सुरवातीपासूनच माझी तब्येत थोडी नाजुक होती. रेलवेतून प्रवास करताना धक्के बसत. माझ्या तब्येतीला हा प्रवास मानवणार नाही म्हणून बाबांनी जून महिन्यात मला ट्रेनने येण्यास मनाई केली होती. श्रीमत शिरसावंद्य; पण एकदा काहीही करून मधुबनला जाण्याची फार ओढ वाटू लागली व तसा प्रवास केला. त्याकाळी दिवसातून एका ठरावीक वेळी 'छोटी शांती' नावाची एक बहीण इतर काहीही सेवा न करता फक्त बाबांच्या खोलीची साफसफाई तेवढी मनापासून करत असे. त्यावेळेत बाबा आपल्या पर्णकुटीत बसून ब्रह्मावत्सांच्या पत्रांना उत्तरे लिहीत असत. मी येऊन बाबांना पर्णकुटीत भेटले. एकदा 'तुझा योग ठीक नाही' असं बाबांनी मला सांगितलं. 'बाबा मी तर माझ्यापरीने पुष्कळ प्रयत्न करत आहे', असं म्हणून मी बाबांकडे पाहिलं आणि तत्क्षणी बाबांनी अत्यंत शक्तिशाली दृष्टी दिली. अशरीरी स्थितीची गहन अनुभूती झाली. तो क्षण मी कधीच विसरू शकत नाही.

पांडव भवनमध्ये ब्रह्माबाबांसमवेत जे थोडे ब्रह्मावत्स राहत असत, त्यात एक 'जवाहर बहन' होती. थोडी चंचल वृत्तीची, नखरे करण्याचा स्वभाव असणारी होती. त्यामुळे भंडाऱ्यात (स्वयंपाकघरात) सेवा करणाऱ्या इतरांना त्रास होत असे. एकदा दीदी मनमोहिनीजी पर्णकुटीत जाऊन त्या बहिणीच्या अशा वागणुकीविषयी बाबांना सांगू लागल्या. शांतपणे त्यांचं म्हणणं ऐकून घेऊन बाबा दीदींना म्हणाले, ''त्या व्यक्तीबद्धल सांगताना तुझा चेहरा का बरं तिच्यासारखा झाला?'' हे पाहून मी शिकले. दुसऱ्यांच्या स्थितीचा किंवा वागण्याचा प्रभाव आपल्या स्व-स्थितीवर, चेहऱ्यावर, देहबोलीवर पडता कामा नये. तेव्हापासून माझी स्वस्थिती नेहमी शांत, स्थिर ठेवण्याकडे माझं लक्ष असतं.

संपूर्ण विश्वात ४० वर्षांहून अधिक काळ ईश्वरी सेवा करण्याचं मला भाग्य लाभलं. बाबांची दृष्टी मिळाल्याने सृष्टीच बदलून गेली. आपलीही दृष्टी अशी असावी ज्याने वृत्ती चांगली बनेल कारण दृष्टी आणि वृत्तीचा संबंध आहे. वृत्तीचा संबंध स्मृतीशी आहे. म्हणूनच आपली स्मृती (मी एक शुध्द आत्मा आहे), दृष्टी (आत्मरूपात आपण सगळे परमात्म्याची लेकरं आहोत) आणि वृत्ती (सर्वांचं कल्याण होवो) अशी पवित्र असावी. 'मी' या देहाचं भान न येता फक्त बाबाच दिसतील इतकी आपली स्मृती पक्की व्हावी.

**भावानुवाद : ब्र.कु. अर्चना, ठाणे (प.)**

***

# ब्रह्माबाबा : एक क्रांतिकारक



**ब्र. कु. मयूर, ठाणे (प.)**

लेखकाचा थोडक्यात परिचय : ब्र. कु. मयूरभाई, गेली चाळीस वर्षे ब्रह्माकुमारी संस्थेशी जोडले आहेत. कुमार जीवनाचे व्रत घेऊन राजयोगाची नित्य साधना करीत आता वयाची भीष्मपितामह स्थिती गाठण्याकडे वाटचाल सुरू आहे. इतक्या वर्षांच्या आध्यात्मिक वाटचालीत त्यांनी ठाणे कारागृहात संस्थेतर्फे २१ वर्षे अविरत सेवा केली आणि अनेकांना जीवन परिवर्तनाची प्रेरणा दिली. याव्यतिरिक्त इतर अनेक सेवांत त्यांनी आजपर्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे व हे व्रत ते आजीव निभावतील यात शंकाच नाही.

जगांत वेगवेगळ्या क्षेत्रांत क्रांती घडविण्यास अनेक माणसे कारणीभूत ठरली. कधी राज्यसत्ता पालटण्यात, तर कधी देश स्वतंत्र करण्यात क्रांतिकारकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दुग्धक्रांती, हरितक्रांती यासारख्या क्षेत्रांत शास्त्रज्ञांनी क्रांती घडवली. विसाव्या शतकांत आध्यात्मिक क्षेत्रांत क्रांती घडविणाऱ्या ब्रह्माबाबांच्या कार्याची नोंद घ्यायलाच हवी अशी त्यांची कामगिरी आहे. हिऱ्याचे व्यापारी असलेले 'दादा लेखराज' जीवनात घडलेल्या साक्षात्कारातून मोठ्या परिवर्तनासाठी प्रेरित झाले. शिव परमात्म्याने त्यांचे शरीरात प्रविष्ट होऊन सत्य गीता ज्ञानरूपी यज्ञ स्थापला. स्वतःची सर्व सम्पत्ती अशा ईश्वरी कार्यास लावली. त्यांच्या वयाची साठी नुकतीच सरली होती. 'ब्रह्मा' हा शब्द मूळ बृहत् म्हणजे




विस्तार करणे या धातुपासून आला आहे. शिवपरमात्म्याने त्यांच्या (दादा लेखराज) मुखाद्वारे ज्ञानप्रसार करायला आरंभ केला आणि दादांचे 'ब्रह्माबाबा' हे कर्तव्यवाचक नाव ठेवले गेले. त्यांच्या जीवनातील क्रांतिकारक पावलांपैकी मोजक्याच गोष्टींचा आढावा घेऊया.

**१) गुरूबंधनातून मुक्तता** – धार्मिक प्रवृत्तीचा माणूस बरेचदा एखादा गुरू करतो व आपली साधना करीत जातो. ब्रह्माबाबादेखील (इथून पुढे लेखांत त्यांचा उल्लेख नुसते बाबा किंवा साकार बाबा असा केला आहे.) या रुढीस अपवाद नव्हते. त्यांची ज्ञानलालसा इतकी होती की त्यांनी आपल्या आयुष्यात बारा गुरू केले. भक्तिमार्गात एकदा गुरू केल्यावर सहसा गुरू बदलत नाहीत; पण बाबा म्हणजे आधुनिक काळातील दत्तच होते जणू. गुरूविषयी बाबांच्या मनांत अपार श्रद्धा असल्यामुळे ते गुरूचा शब्द खाली पडू देत नसत. गुरू प्रवचनाला बसले असता

ते उठत नसत, ते गुरूचा अवमान करीत नसत. इतकी समर्पणमय स्थिती असूनही एकदा प्रवचन चालू असताना ते उठले आणि दुसऱ्या खोलीत जाऊन बसले.

शिव परमात्म्याच्या अवतरणाची तीच मंगल वेळ होती. तिथूनच साकार बाबांच्या जीवनात ज्ञानोदय झाला. बाबांनी घडल्या घटनेची शहानिशा करण्याकरिता पुन्हा गुरूशी संवाद साधला. गुरूनेही नम्रपणे सांगितले, ''लखीबाबू तुम्हाला ईश प्राप्तीचा कृपाप्रसाद लाभला आहे; पण त्यात माझा चमत्कार काही नाही.'' हे ऐकल्यावर त्यांच्या मनाची गुरूबंधनातून मुक्तता झाली. अंतरीची खूण पटली. परमेश्वर (हाच खरा सद्गुरू), बाकी दैहिक गुरूच्या नात्याची गरज संपली. बाबांच्या मनात असा प्रश्न नाही आला, 'गुरू नाराज होतील, शाप देतील की काय!' हे त्यांच्या आध्यात्मिक प्रवासातील पहिले पाऊल ठरले, असे म्हणायला हरकत नाही.

**२) साथ-साथ चलो रे –** सर्वसाधारणपणे आध्यात्मिक जागृती झाल्यावर मनुष्य, प्रथम स्वतःची उन्नती साधतो. काही तप, साधना करून विशिष्ट स्थिती गाठल्यावर इतरांना मार्गदर्शन करण्याचे व्रत घेतो. मात्र बाबांनी आपल्या घरातच सत्संग सुरू केला. ॐ चा ध्वनी करुन सत्संगाची सुरूवात होत असे म्हणून 'ॐ मंडळी' असे नाव रुढ झाले. या सत्संगात सर्वात जास्त संख्येने माता-भगिनींची उपस्थिती होऊ लागली. ही विलक्षण गोष्ट १९३७ च्या सुमारास घडली. समर्थ रामदासांनी वेण्णाक्कांसारख्या शिष्येस तयार केले, स्वामी विवेकानंदांच्या मार्गदर्शनाखाली 'सिस्टर निवेदिता' साधक बनल्या. पण इथे दोन-तीनशे माता-भगिनी एकत्र येऊन सत्संगाचा लाभ घेऊ लागल्या. इतकेच नव्हे तर कडकडीत ब्रह्मचर्यव्रताचे पालन गृहीणी करू लागल्या. शास्त्र-पुराणात अनेकांनी आजवर स्त्रियांना हिणवलं आणि साकार बाबांच्या रूपात स्त्रियांच्या गौरवाचं, उत्थानाचं बीज रोवलं गेलं. अशी आध्यात्मिक चळवळ यापूर्वी कधी उभारल्याचं इतिहासात सापडत नाही. एकला चलो रे हे सन्यस्त वृत्तीचं ब्रीदवाक्य म्हटले तर बाबांनी सबको साथ लेकर चलो रे हा सिद्धांत रुजवला.

**३) आत्मबलसम्पन्न सेना –** माता-भगिनी ॐ मंडळीत सामील झाल्या तेव्हा त्या समूहात कितीतरी कन्या होत्या. अगदी चार-पाच वयाच्या मुलींपासून ते चौदा-पंधरा वयोगटातील अनेक कन्यका या सत्संगातील नित्य साधक बनल्या. अशा कन्यांचे लौकिक शिक्षणही व्हावे याकरिता बाबांनी एक शाळा सुरू केली. शाळेचे वैशिष्ट्य होते- त्यावेळेस शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मुलीच शिक्षिका बनल्या. शाळेत लौकिकार्थाचे शिक्षण, आध्यात्मिक शिक्षण तसेच उपजीविकेसाठी शिवणकाम अशा अनेक गोष्टी सम्मिलित केल्या होत्या. मुलींचे वसतिगृह व त्याचे व्यवस्थापनही स्त्रियांकडेच सोपविले होते. १९३७ च्या कालखंडात अशा प्रकारची शाळा स्थापन केल्याचे दुसरे उदाहरण सापडणे दुर्मीळ वाटते. अशा मुला-मुलींची शाळा म्हणजे विद्यार्थी सेना आणि आत्मबळधारी सेना असा अनुपम संगम होता हे जणू तिसरे पाऊल ठरावे.

**४) टाकीचे घाव सोसून देवपण –** वर उल्लेखिलेल्या प्रसंगानंतर तत्कालीन समाजात सिंध हैदराबादेत एकच गोंधळ उडाला. हे कसलं आलय ब्रह्मज्ञान ? असे कुणी ब्रह्मचर्यव्रताचे पालन करते का ? अशा प्रकारची वावटळ उठली. समाजात टीकेची प्रचंड झोड उठली. त्यावेळेसच्या 'सिंध ऑब्जर्व्हर' नावाच्या वर्तमानपत्रात तर अनेकानेक उलटसुलट चर्चा झाल्या. त्याचे पडसाद अगदी अमेरिकेपर्यंत गेले. ॐ मंडळीच्या विरोधात निदर्शने झाली, समाजात छी थू झाली, कोर्टात खटला भरविण्यात आला. विरोध व्यक्त करण्याची जेवढी साधने वा मार्ग होते ते सर्व अवलंबिण्यात आले. मात्र साकार बाबा अत्यंत निश्चल व खंबीर राहिले. पवित्रतेच्या धारणेचा हा मार्ग इतका सुलभ नाही हे त्यांनी आपल्या आचरणातून लोकांना दर्शविले. पण हे सगळं झेलताना मनांत कडवटपणाचा लवलेशही येऊ दिला नाही. इतकेच काय पण सत्संगातील माता-भगिनींना देखील हीच शिकवण दिली. त्यांच्याही मनांत विरोधकांबद्दल दुजाभाव उत्पन्न

होऊ दिला नाही. हे होतं पुढचं पाऊल.

**५) भवसागरातील वादळे –** अलौकिक शाळेत शिकून सर्वार्थाने मोठ्या झालेल्या माता–भगिनी नेतृत्वकर्त्या झाल्या. तावून–सुलाखून निघताना या भगिनीदलाने कधी शर्ट–पॅण्ट घालून कवायतीही केल्या तर कधी वर्षभराकरिता सरस्वती देवीप्रमाणे केस मोकळेच ठेवून तपही केलं. तूप रोटीही खाल्ली तर कधी एक वेळचं जेवणही कठीण अशी परिस्थिती देखील झेलली. १९५०साली संस्था सिंध कराचीहून म्हणजेच पाकिस्तानातून भारतात आली आणि परीक्षेचे नवे रूप समोर आले. साकार बाबा आणि काही समर्पित लोकांच्या पैशावर चौदा वर्ष चालणाऱ्या संस्थेसमोर आर्थिक चणचण उभी राहिली. ज्या व्यक्तीने सुटबुटात राजेमहाराजांसोबत दिवस काढले त्यांना दुपारच्या जेवणाची भ्रांत निर्माण झालेली पहावी लागली. फक्त स्वतःपुरता विचार करायचा नव्हता तर सोबत असलेल्या तीन–साडेतीनशे लोकांच्या भरण पोषणाचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याही परिस्थितीत क्षीरसागरातील विष्णू समान स्थिर वृत्तीचे दर्शन बाबांनी स्वतःच्या जीवनातून दाखविले ही मोठी गोष्ट आहे.

**६) मन चलो निज निकेतने –** एकेकाळी ऐश्वर्यसम्पन्न आयुष्य जगणाऱ्या बाबांनी, ज्ञानोदय झाल्यावर सम्पूर्ण वैराग्य धारण केले. साधे धोतर कुडता हाच वेश कायम ठेवला. राहावयास एक अत्यंत साधी पर्णकुटी आणि पायात खडावा असे आमूलाग्र बदल झाले. आंतरिक बदलही सर्वांना जाणवत गेले. कुठल्याही आसक्तीचा लवलेशही उरला नाही. एकाचवेळी अत्यंत स्नेहयुक्त आणि तितकेच निर्मोही अशी स्थिती गाठली. ‘काही गलबला काही निवळ ऐसा कंठित जावा काळ’ यानुसार सर्वांत असूनही जणू मन बुद्धीने ब्रह्मांडात (परमधामातच) निवास करणारे बनले. व्यक्तिगत साधनेत कुठलीही उणीव ठेवली नाही. ‘जसे कर्म मी करेन तसेच माझी मुले करतील’ ही जाणीव सतत जागृत ठेवली. एक आदर्श जीवन सर्वांसमोर ठेवले, ते आजही एखाद्या नंदादीपाप्रमाणे तेवत आहे, मार्गदर्शन करत आहे. अशा साकार बाबांनी १८ जाने. १९६९ रोजी आपला देह ठेवला आणि आध्यात्मिक क्रांतिकारकाचा एक आगळा वेगळा आदर्श जगासमोर आणला.

अशा ब्रह्माबाबांविषयी किती लिहावे हा एक प्रश्नच आहे आणि तो अनुत्तरितच राहणार !

***

---

**(पान क्र. १३ वरून)**

समय आयेगा की बीमारी की कोई दवा नही होगी, ना डॉक्टर मिलेंगे ना कुछ कर सकेंगे।’ हीच ती वेळ आहे ना. परिस्थिती येणार पण आपली स्थिती जर अचल अडोल, शक्तिशाली असेल तर सहज आपण त्यावर मात करू शकतो. त्यासाठी स्वमानात रहावे ‘मी मास्टर सर्वशक्तिवान आहे’. त्याचबरोबर बाबांची आठवण करून शक्ती घेऊन स्वतःला शक्तिशाली करणे व संपूर्ण विश्वातील दुर्बल आत्म्यांना शक्तीचे दान देणे ही मानस सेवा करावी. अशा परिस्थितीत आपल्या सुरक्षिततेसाठी ईश्वरी ज्ञान व योग हाच आधार आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते. ‘ईश्वर अपने साथ है तो डरने की क्या बात है।’

***

## वाचकांस नम्र आवाहन

टाळेबंदीच्या काळात (लॉकडाऊन) ज्या वाचकांपर्यंत ई–प्रत पोहोचत होती त्यांनी आपल्या प्रतिक्रिया आवश्य कळवाव्या. इथून पुढील काळातही आपल्या सूचना व प्रतिसाद दिल्यास त्यानुसार आवश्यक ते बदल करण्याचा प्रयत्न आम्ही करू.



# हर्षितमुखता

**ब्र. कु. लक्ष्मी, बोपोडी, पुणे**

आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये प्रत्येक गोष्टीची महागाई वाढलेली आहे. या महागाईबरोबरच लोकांची दगदग, धावपळही वाढलेली आहे. लोकांचे जीवन इतके व्यग्र झालेले आहे की त्यामुळे लोकांना एकमेकांकडे बघायला, बोलायला, एकमेकांची विचारपूस करायला वेळ नाही. मानवाच्या व्यग्र जीवनामधे आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, चेहऱ्यावरील हास्य यांचा अस्त होत चाललेला आहे. या अति घाईमुळे एक स्मित हास्य, गोडवा हेसुद्धा जास्तच महाग झाले की काय असे वाटते. जगात सर्व काही उपलब्ध असूनही माणसांच्या मनामध्ये नीरसता, उदासीनता, एकमेकांमधील नाराजी, दुरावा वाढत चाललेला आहे. तसे पाहता सर्वांना एकमेकांच्या जवळ आणण्यासाठी मुखातून दोन गोड शब्द व ओठांवरील निर्मळ निःस्वार्थ गोड हास्य खूप मोठं कार्य करीत असते. ज्याची नेहमीच हर्षितमुद्रा असते, तीच जगामध्ये सर्वात सुंदर व्यक्ती असते. हसतमुख व्यक्तीच सर्वांना प्रिय असतात. इतरांनाही त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता पाहून थोड्यावेळापुरती का होईना मनाला प्रसन्नता मिळत असते. त्यांच्यामध्ये उत्साह कायम दिसून येत असतो. देव-देवतांना नेहमीच स्मित हास्य मुद्रेत दर्शवितात. त्या मूर्तींच्या केवळ दर्शनानेच मन शांत व प्रसन्न होते. अगदी तसेच प्रकंपन स्मितहास्य मुद्रेमुळे वातावरणामध्ये पसरते. लहान मूल जेव्हा हसते तेव्हा त्याला पाहून सर्वजण आनंदी होतात. ते हास्य पाहणाऱ्याच्या चेहऱ्यावरही आनंदाने ओतप्रोत हास्य उमलतं. कारण लहान बाळाच्या हास्यात कोणताही दुजाभाव नसतो.

**जसे उमललेले फूल सर्वांनाच आवडते. फुलामधील सुगंध हेच फुलातील हास्य असतं, ते लांबूनही व्यक्तींना सुगंधरूपी आकर्षण आणि प्रसन्नता देते. आपणही आपला चेहरा नेहमी निर्मळ हास्याने उमलता ठेवला तर सर्वांना आपल्याकडे पाहून प्रसन्नतेची, आनंदाची अनुभूती येईल. व्यक्तीचा हर्षित चेहरा दुःखी, उदास मनांतही नवचैतन्य भरतो. ह्यासाठी आपणही आपले जीवन दिव्य गुणांच्या धारणेने सुंदर आणि सुगंधी बनवावे जेणेकरून आपले स्वतःचे जीवन दिव्यगुणसंपन्न बनवून ईश्वरचरणी फुलाप्रमाणे अर्पण करता येईल.** फुले आपल्या अल्प आयुष्यात सर्वांना सुख देतात. कोणाकडून काही इच्छा, अपेक्षा करत नाहीत. जी व्यक्ती जीवनामध्ये कोणाकडून काहीही अपेक्षा करीत नाही, इच्छा बाळगत नाही तीच व्यक्ती जीवनात खरी आनंदी राहू शकते. कारण ज्या वेळेस दुसऱ्यांकडून आपण काही अपेक्षा करतो आणि त्या अपेक्षा भंग होतात. तेव्हा मनुष्य दुःखी व नाराज होतो. इच्छा ही अशी गोष्ट आहे की ती कधीही संपत नाही. आज मनुष्य इतका लोभी झालेला आहे की त्याची एक इच्छा पूर्ण झाली तरी समाधान होत नाही. लगेचच दुसरी इच्छा डोकं वर काढते आणि त्या पूर्ण नाही झाल्या की पुन्हा त्यातून नाराजी, उदासी येते. चेहऱ्यावरील हास्य, आनंद ओसरायला लागतो. जीवनात खऱ्या अर्थाने सदा सुखी, आनंदी, हसतमुख राहण्यासाठी आपल्या जीवनातून इतरांना नेहमी काहीतरी प्राप्त करून देण्याची धारणा केली पाहिजे. जे जे आपण जगाला देऊ शकतो ते देतच राहायचे. तेच आपल्या जीवनाला पोषक ठरतं. इतरांना देण्यासारखे काहीच नसेल असा जगात एवढा गरीब मनुष्य कोणीही नाही. आपण निःस्वार्थ, निर्मळ, स्मित हास्य तरी किमान प्रत्येकाला देऊ शकतो. ह्यासाठी तर कोणाला पैसे मोजावे लागत नाहीत.

***

# दादी ह्रदयमोहिनीजी यांचा क्लास आणि प्रश्नोत्तरे



जेव्हा आपण संघटनेत काम करीत असता, तेव्हा छोट्या मोठ्या गोष्टी / अडथळे सतत येतच राहणार; पण आपले लक्ष पूर्णतः ज्ञानाभ्यास आणि योग यावर असेल तर सतत आनंदाचा अनुभव करू शकतो.

बाबांनी आपल्या सर्वांना मग कोणी भारतातील असो किंवा जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यातील असो, अक्षरशः शोधून, वेचून काढले आहे आणि प्रत्येकाला आपले अतिशय लाडके अपत्य मानले आहे, बनवले आहे. ह्यामुळेच आपण जेव्हा एकमेकांना भेटतो तेव्हा आपल्याला एक आन्तरिक आपुलकीचा अनुभव येतो. बाबांनी आपल्या मुलांसाठी हा किती सुंदर आणि भव्य हॉल (डायमण्ड हॉल) बनवून दिला आहे. ह्याच सभागृहात बसून बाबांना आरामात भेटू शकतो. बाबा आपली किती काळजी घेतात. बाबांचे आपल्या मुलांवर किती प्रेम आहे. ह्यातील प्रत्येक अपत्य स्वतःला घडवीत आहे. हे पाहून बाबांनापण खूप छान वाटत असणार निश्चित. मुलांच्या छोट्या छोट्या गोष्टींवर बाबांचे लक्ष असते. साकार बाबा (ब्रह्माबाबा) सुद्धा मुलांच्या छोट्या छोट्या सुखांसाठी झटत असत. बाबांचे प्रेम प्राप्त करणे हा आपला हक्कच आहे. जेवढे बाबांचे प्रेम प्राप्त कराल तेवढी आपल्याला आपल्या भाग्याची अनुभूती होत राहील. कोणी आजारी असेल तर बाबा म्हणत असत अरे हा आजार मी घेतो; पण मुलाला दुःख नको. विचार करा, आपले बाबांवर एवढे प्रेम आहे? खरे प्रेम असेल तर कशाचाही त्याग करू शकाल. पण वस्तूच नाही तर खऱ्या प्रेमामुळे आपल्या जुन्या संस्कारांचाही त्याग करणे ही गोष्ट सोपी होऊन जाते. सकाळपासून रात्रीपर्यंत जी काही दिनचर्या येथे आहे ते पाहून मनापासून वाटते 'वाह बाबा वाह' । जेव्हा तुमची इथली दिनचर्या बघते, तेव्हा माझ्या लहानपणाच्या आठवणी ताज्या होतात. बाबांनी आमच्यासुद्धा सुखासाठी कितीतरी व्यवस्था केली होती. जोपर्यंत साकार बाबांजवळ राहात होतो तोपर्यंत बाबांनी आम्हाला अपार सुखात ठेवले. जेव्हा सेवेसाठी अन्य स्थानांवर गेलो तेव्हा प्रत्येक ठिकाणी आपापली वैशिष्ट्ये होती. पण तुम्हाला ह्या ठिकाणी जशी सुखाची सर्व साधने उपलब्ध आहेत तसे बाबांनी आमचे सुद्धा खूप लाड पुरविले. बाबांनी सर्वांसाठी हे सुंदर स्थान बनविले. सर्वांच्या सहकार्याने बनविले; पण बनवणारा कोण? बाबा! तेव्हा मनापासून वाटते वाह बाबा वाह ! आपापल्या सेवा स्थानावर जी साधने असतील तशीच किंवा त्याहून अधिक सुखाची साधने येथे उपलब्ध करुन देणे ही काही छोटी गोष्ट नाही. तेव्हा इथे ह्या सुखांचा लाभ घेताना तुम्हाला जी ज्ञान आणि योगाची शिकवण मिळत आहे ते पाहून तुम्ही तर सतत अलौकिक धुंदीत रममाण झाले पाहिजे. बाबा जशी आता आपली काळजी घेत आहेत, सुख देत आहेत तशी कदाचित सत्ययुगात राजकुमार राजकुमारीची बडदास्त नसेल! आपल्यासारखे भाग्यवान आपणच! बाबांनी तुमच्यापैकी प्रत्येकाला विविध स्थानांवरुन शोधून, वेचून, पारखून इथे एकत्र आणले आहे. बाबांनी इथे तन, मन आणि धन तीनही प्रकारचे सुख दिले आहे. जे धनवान असतील त्यांना जगात फक्त तनाने सुख मिळत असते पण मनाचे सुख? ते नक्कीच नाही. आपल्याला तर सर्व बाबतीत सुख प्राप्ती आहे तनाची आणि अर्थात् मनाचीही! स्वतःला जरा विचारून पहा 'मी नेहमी आनंदी असतो का?' अशाप्रकारच्या

संघटनेत राहात असताना छोट्या छोट्या गोष्टी होतच राहणार. पण सर्वातील गुणवैशिष्ट्ये बघत, येथील वास्तव्यात फायद्याचाच विचार करा म्हणजे सतत आनंदाचा अनुभव होत राहील.

कोणत्याही परिस्थितीत बाबा आपल्याला सतत सुखातच ठेवतो. असे बाबा आपल्याला परत कल्पानंतरच भेटणार. बाबांनी आपला जणू उद्धार केला आहे पण त्याच बरोबर जे आन्तरिक सुख दिले आहे त्याला तोड नाही. आपल्या प्रत्येकाचे जीवन असाधारण आहे. एकत्र राहताना, स्वभाव संस्कार थोडे मागे-पुढे होणारच; पण बाबांच्या प्रेमापुढे आपण ते सहज विसरून जातो. ज्ञानामुळे शक्ती प्राप्त होते. या लौकिक जगाची अवस्था कशी आहे आणि बाबांनी आपल्याला किती भाग्यवान, श्रेष्ठ बनविले आहे ह्या आनंदास तोड नाही. बाबा आपल्याला रोज आनंदाचा खजिनाच देतात हीच तर बाबांची कमाल आहे. इतर धार्मिक स्थळे आणि हे स्थान ह्यात मुख्य फरक कोणता? इथे घर आणि शाळा दोन्ही एकत्र आहे. जेव्हा मुरली क्लासमध्ये असता तेव्हा शाळा असते; पण जेव्हा एकत्र भोजन वगैरे करता तेव्हा आपल्या घरची जाणीव होते. स्वतः ईश्वर पित्याच्या स्वरूपात आपले प्रत्यक्ष भरणपोषण करीत आहे ही तर अत्यंत असाधारण/ विशेष गोष्ट आहे. ज्ञान, योग आणि आपली वर्तणूक ह्यावरचे शिक्षण इथे जितके मिळते तसे दुसरीकडे कुठेही मिळणे अशक्य !

**१) प्रश्न : आपल्या ब्राह्मण जीवनाचा पाया ज्ञानाभ्यास आहे. तेव्हा ह्या अभ्यासावर सतत लक्ष केंद्रित राहण्यासाठी काय करणे आवश्यक आहे ?**

उत्तर : आपले जे मुख्य चार विषय आहेत (ज्ञान, योग, धारणा आणि सेवा) त्या सर्वांवर विशेष लक्ष ठेवणे आवश्यक आहे. अगदी सुरूवातीला म्हणजे आपण जेव्हा बाबांचे बनतो तेव्हा बाबा आणि ज्ञानाभ्यास दोन्हीवर आपले लक्ष असते. आपला उत्साह एकदम ताजा असतो. पण हळूहळू माया आपले रंग दाखवू लागते. सुरूवातीला ईश्वरी नशा असतो पण मग जेव्हा कोणताही प्रसंग येतो तेव्हा मग अवस्था थोडी डळमळीत होते. आपले कसे होणार, काय होणार असे विचार येऊ लागतात. परन्तु जर आपण बाबांनी सांगितलेल्या दिनचर्येप्रमाणे निश्चयाने चालत राहिले तर सर्व सुरळीत होते. आनंदाचा पारा सतत उत्तम राहतो. सकाळी मुरली ऐकून संपूर्ण दिवस त्याचा प्रत्यक्ष अनुभव करीत रहा. मुरली, योग दोन्ही कधीही चुकवू नका. मुरली क्लासमध्ये फक्त शरीराने नाही तर मनाने उपस्थित रहा. संगदोषापासून सतत सावध रहा. मला प्रत्यक्ष ईश्वर प्राप्तीच झाली आहे ह्या नशेत आणि अलौकिक आनंदात रहा.

**२) प्रश्न : दादीजी परचिंतन मुक्त कसे बनावे ?**

उत्तर : जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मुरलीवर विचारसागर मंथन करीत रहा. परचिंतन करण्यात काही फायदाही नाही आणि प्राप्तीही नाही. एकत्र राहताना परचिंतन होण्याची शक्यता आहे; पण ज्ञानाभ्यासावर लक्ष केंद्रीत केले तर परचिंतन टाळू शकतो. दिवसभर सेवा करतानासुद्धा स्वतःच्या उन्नतीसाठी आपल्या मन आणि बुद्धीसाठी एक वेळापत्रक बनवा. रोज सकाळी विचार करा आज मला नवीन काय करावयाचे आहे. आज माझे कर्म आणि वाणी ह्यात कोणते नाविन्य असावे? मनाची दिनचर्या स्वतः बनवा. ह्यात ढिले होऊ नका. स्वतःच्या प्रगतीसाठी मनाचे वेळापत्रक बनवा / स्वतःतील जे दोष आहेत ते नीटपणे समजून त्यावर काम करण्यासाठी, ते काढून टाकण्यासाठी मनाची दिनचर्या बनवा व त्यानुसार कार्य करत रहा.

**३) प्रश्न : दादीजी, ह्या मार्गावर चालत असताना ईर्ष्या, द्वेष उत्पन्न होतो पण हे नैसर्गिक आहे ?**

उत्तर : संघटनेत एकत्र काम करताना ईर्ष्या द्वेष उत्पन्न होतो; पण ह्यामुळे फायदा तर काहीच नाही उलट नुकसानच होते. सतत कोणाबरोबर ईर्ष्या करत रहाल तर ती एक सवय जडेल आणि त्यातून मुक्त होणे कठीण होईल. आपल्याला बरोबर काम करणाऱ्यांकडे न पाहता मम्मा-बाबांनी घालून दिलेल्या आदर्शाकडे बघायचे आहे. इतर कोणाकडे पाहाल तर त्यांच्यातील दोष कमतरता दिसू लागतील. आपले ध्येय आहे स्वतःच्या उन्नतीकडे लक्ष ठेवण्याचे, इतरांशी ईर्ष्या करण्याचे नाही, स्वतःला सतत उत्साह, प्रेरणा देत राहणे, मधेच साथ न सोडता, बाबांचा पक्का पुत्र बनविणे.

**भावानुवाद – ब्र. कु. विनय, ठाणे (प.)**



# आत्मिक शांती व आनंदी जीवन

ब्र.कु. स्नेहा, पीस पॅलेस, कोल्हापूर

आज सर्वसाधारण मान्यता आहे की, अन्न – वस्त्र – निवारा या जीवन जगण्यासाठी व्यक्तीला लागणाऱ्या तीन मूलभूत गरजा आहेत. सर्वसामान्यपणे या गरजा पूर्ण करण्यासाठीच व्यक्ती आयुष्यभर प्रयत्न करीत असते. गरीब व्यक्तीची पोट भरण्यासाठी, अंग झाकण्यासाठी आणि रात्री धरणीला पाठ टेकण्यासाठीची धडपड चालू असते; तर मध्यमवर्गीय व्यक्ती त्यातल्या त्यात याच तीन गरजा आपल्याला किती समाधानकारक किंवा किती चांगल्या प्रतीच्या मिळतील यासाठी सतत झटत असते; तर एकीकडे काही श्रीमंत व्यक्ती याच तीन गोष्टींमध्ये आम्ही स्वतः सर्वांपेक्षा किती आलीशान व चांगले जीवन जगत आहोत हे सगळ्यांना दाखवून देण्यासाठी आणि त्याचबरोबर सर्वांची वाह वाह मिळवण्यासाठी आपले जीवन खर्च करतात.

सर्वसाधारणपणे हाच जीवन जगण्याचा मूलभूत उद्देश सर्वांमध्ये रुजत चालला आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती हाच उद्देश पूर्ण करण्यासाठी आपले आयुष्य वेचत असतो, किंवा याच तीन गोष्टी किती चांगल्या प्रतीच्या आपल्याला मिळवता येतील हे पाहताना दिसतो. 'ह्याच उद्देशाकरिता तुला चांगले शिकायचे आहे, आणि शिकून पैसा मिळवायचा आहे. अन्न – वस्त्र – निवारा या तीन गोष्टी तुझ्याकडे जितक्या चांगल्या प्रतीच्या असतील, तितका तुला समाजात मान – मरातब मिळेल व तुझी प्रतिष्ठा वाढेल.' हेच लहानपणापासून बहुतेकांच्या मनावर ठसवलं जाते. ही धारणा प्रत्येक व्यक्तीच्या मनावर इतकी बिंबवली जाते की समाजात सन्मानाने जगायचे असेल तर हीच वाट योग्य आहे असे प्रत्येकाला वाटू लागते आणि असेही वाटते की याशिवाय दुसरा मार्गच नाही.

म्हणूनच या वाटेवर चालण्याची प्रत्येकाची धडपड, आपण आपल्या आजूबाजूला नेहमी बघत आहोत. तसेच अन्न – वस्त्र – निवारा हे व्यक्तीसाठी आज केवळ गरज न राहता, ती एक प्रतिष्ठेची बाब बनली आहे. मग त्यासाठी व्यक्ती आपले सर्वस्व पणाला लावते व ते मिळवण्यासाठीच आयुष्यभर झटत राहते. असे असेल तर, आयुष्यभर मेहनत करून हे सर्व मिळवल्यानंतर व्यक्तीचे जीवन सुख – समाधानाने, आनंदाने भरून जायला हवे! पण तसे न होता, आज आपण समाजामध्ये पाहतो की सर्व साधने, संपत्ती असूनसुद्धा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात कुठे ना कुठे अशांती, दु:ख, विफलता, निराशा डोकावतेच.

मग हा प्रश्न उभा राहतो की माणसाला नक्की काय हवे आहे? अन्न – वस्त्र – निवारा ही गरज तर आहेच, आणि ती व्यवस्थित भागायलाही हवीच. पण जीवन सुखी – समाधानी राहण्यासाठी मानवाला नक्की काय हवे? ह्यासाठी काय करायला हवे हे कळत नाही. आजच्या विज्ञानाने संपन्न – समृद्ध अशा असलेल्या भौतिक युगात माणूस स्वतःलाच हरवून बसला आहे. क्षणभंगूर आनंदच खरा आनंद मानून, त्याच्यामागे शर्यत लावल्यासारखे पळायला लागला आहे आणि मग कालांतराने या शर्यतीमुळे तो थकून जातो, कधी कधी हताश होतो. त्याबरोबरच काही वेळेला जीवनात कधी जटिल परिस्थिती येते, कधी संबंध बिघडलेले असतात, कधी व्यवसायातील चढ – उतार असतात, कधी नोकरीतील अस्थिरता असते, तर कधी साधने समस्या निर्माण करतात. त्यामुळे व्यक्ती आणखीनच खचते, गोंधळून जाते.

अशा वेळी व्यक्तीला खऱ्या, शुद्ध

आत्मिक शांति – सुखाची ओढ जाणवू लागते. मग त्यासाठी शोध मोहीम सुरू होते. जप – तप, यज्ञ, उपवास, ज्योतिष, कर्मकांड यामध्ये व्यक्ती खरी सुख – शांती शोधू लागते. पण तिथेही मनासारखे समाधान नाही लाभले तर ती असंतुष्टच राहते. मग वाटू लागते की, अजूनही काही आहे जे आपल्याला मिळालेले नाही.

तिथे खऱ्या अर्थाने सुरू होतो स्वतःचा शोध, सत्याचा शोध. व्यक्ती आता अंतर्मुख व्हायला लागते, आत वळायला लागते, आणि स्वतःशी बोलू लागते. स्वतःला विचारु लागते की मन:शांतीसाठी नक्की काय करायला हवे आहे? अन्न, वस्त्र, निवारा, मान – मरातब, पैसा, संपत्ती, आधुनिक वैज्ञानिक साधने सर्वकाही तुझ्याकडे असूनही, तू अशांत का?

तिथेच आध्यात्मिकतेचे बीज पडते. खऱ्या अर्थाने स्व चा शोध सुरू होतो, स्व – बोध व्हायला लागतो, आणि व्यक्तीला तेव्हा स्वतःची ओळख होते की, आपण आरश्यात दिसणारे प्रतिबिंब म्हणजे शरीर नाही तर शरीरपासून भिन्न, एक चैतन्य शक्ती आत्मा आहोत आणि मन हे आत्म्याचाच एक भाग आहे, खरी शांतता आपल्या आतच सदैव उपस्थित आहे. जसे की कस्तुरी मृगाला स्वतःजवळ असणाऱ्या कस्तुरीची माहिती नसते, ते कस्तुरीचा शोध घेण्यासाठी सर्वत्र धावत असते. तसेच आज मनुष्यात्मा स्वतःजवळ असणाऱ्या या शांतीरूपी कस्तुरीला पूर्णपणे विसरून गेलेला आहे आणि व्यक्ती, वस्तु, वैभव यामध्ये शांती शोधायला लागला आहे. पण व्यक्तीला हे जाणून घ्यायला हवे की ती शांतीरूपी कस्तुरी स्वतःजवळच आहे आणि त्यासाठी स्वतःला केवळ स्मृती द्यायची आहे की, 'मी एक शांत स्वरूप आत्मा असून मी मूळ शांतीधामचा रहिवासी आहे व शांती सागर शिव परमात्म्याची संतान आहे.'

केवळ इतक्या स्मृतिनेच व्यक्तीला आत्मिक शांतीचा अनुभव होऊ लागतो. या आत्मिक शांतीमुळे मन स्थिर होते आणि ती सकारात्मक विचार करू लागते. तिच्या कर्मेन्द्रियांची चंचलताही कमी होऊन त्यामध्ये शीतलता येते आणि व्यक्तीला परम शांतीचा अनुभव होऊ शकतो. मिळणाऱ्या शांततेच्या अनुभवामुळे, व्यक्ती अचानक येणाऱ्या समस्यांना, संबंधांमध्ये येणारा दुरावा, कार्यक्षेत्रातील तणाव या सर्वांना सहजतेने सामोरे जाऊ लागते. तिला होणाऱ्या आत्मिक शांततेच्या अनुभवामुळे तिची आंतरिक शक्ती वाढीस लागते.

आजच्या समाजाची अवस्था तर आपण सर्व पाहतच आहोत, आणि आपल्याला ह्याची ही जाणीव आहे की अशा वातावरणात आपल्याला मनासारखे सहज, सुलभ जीवन जगणेही खूप अवघड गोष्ट आहे. अशा वेळी ही आत्मिक शांतीची अनमोल कस्तुरी आपल्याजवळ असणे आवश्यक आहे. ती जर जवळ असेल, तर आहे त्या परिस्थितीत, तेच घर, तेच कार्यक्षेत्र, तीच आजूबाजूला असणारी वेगवेगळ्या स्वभावाची माणसे, येणाऱ्या अडचणी या सर्वामध्येही आपण आपले जीवन आनंदाने, सुख – समाधानाने, शांतीने जगू शकतो. आत्मिक शांतीच्या अनुभवाने व्यक्तीची आंतरिक नियंत्रण शक्ती, सकारात्मक दृष्टीकोण वाढतो आणि याआधारे व्यक्ती प्रत्येक परिस्थितीला सहजतेने सामोरे जाऊन त्यावर विजय मिळवते. कुठलाही विजय हा आनंदच देतो आणि आत्मिक शांतीमुळे मिळालेल्या विजयाद्वारे व्यक्ती नेहमीच आनंदी राहू शकते.

म्हणूनच आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला आनंदाने जगायचे असेल तर, आपल्याजवळ सदैव उपस्थित असलेल्या आत्मिक शांतीची ओळख करून घेणे खूप गरजेचे आहे आणि ही 'आत्मिक शांती' आपण खूप सहजपणे जागृत करू शकतो.

ह्यासाठी आपल्याला एक करावे लागेल की, आपल्या व्यग्र दिनचर्येतून थोडा वेळ स्वतःसाठी काढावा लागेल व स्वतःच्या सत्य स्वरूपाला म्हणजेच आत्म्याला ओळखून, परमात्म्याशी मन – बुद्धीची तार जोडून किंवा त्याच्याशी एकाग्र होऊन, शांतीच्या शक्तीने भरपूर व्हायचे आहे, जेणेकरून आपले जीवन खऱ्या अर्थाने आनंदमय होऊ शकेल. 'आत्मिक शांती' हीच आनंदी जीवनाची खरी गुरुकिल्ली आहे.

***

# सेवा समाचार – भांडुप सेवाकेंद्र

''ब्रह्माकुमारीजच्या भांडुप सेवाकेंद्र व मुलुंड सी.ए. स्टडी सर्कलच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीनिमित्त चार्टर्ड अकाउंटंट्ससाठी खास व्याख्यान'' आयोजित केले होते.

ब्रह्माकुमारीज्तर्फे सन २०११ पासून दरवर्षी मुलुंड सी.ए. स्टडी सर्कलच्या सभासदांसाठी दिवाळीनिमित्त खास कार्यक्रम भांडुपच्या मधुबन गार्डनमध्ये आयोजित केला जातो. यावर्षी मात्र कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर ही परंपरा ऑनलाइन माध्यमातून चालू ठेवण्यात आली. यावर्षीच्या कार्यक्रमात २१ नोव्हेंबर २० रोजी सुप्रसिद्ध आध्यात्मिक वक्त्या ब्र. कु. शिवानी बहेन यांच्या प्रवचनाचा लाभ सी.ए. बांधवांनी घेतला. या कार्यक्रमात ब्रह्माकुमारीजच्या मुलुंड उपप्रभाग संचालिका राजयोगिनी गोदावरी दीदी, भांडुप सेवाकेंद्र संचालिका ब्र. कु. लाजवंती दीदी, इंस्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकांडटंट्सचे माजी अध्यक्ष प्रफुल छाजेड यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांची सन्माननीय उपस्थिती होती. स्टडी सर्कलच्या सुमारे २०० सदस्यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

स्टडी सर्कलचे निमंत्रक सी.ए. अल्पेश दोशी यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करतानाच या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल स्टडी सर्कलतर्फे आपली कृतज्ञता व्यक्त केली.

भांडुप सेवाकेंद्र संचालिका बु. कु. लाजवंती यांनी कार्यक्रमाची परंपरा यावर्षीदेखील ऑनलाईन माध्यमातून सुरू ठेवल्याबद्दल स्टडी सर्कलचे अभिनंदन केले. या परिस्थितीतही कार्यक्रम करण्याच्या निर्धारामुळे सर्वशक्तिमान परमात्मा शिवबाबांचे विशेष आशीर्वाद सर्वांना प्राप्त झाले आहेत, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या या दहाव्या वर्षात आपले सभासद हे पाहुणे न राहता शिवबाबांची मुले बनतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

माजी अध्यक्ष सी.ए. प्रफुल छाजेड यांनी दरवर्षी मधुबन गार्डनमध्ये संपन्न होणाऱ्या कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक करताना, दीप प्रज्वलन, तन व मनासाठी पौष्टिक खाद्य ईश्वरी भेटवस्तू अशा अनेक गोष्टींचा उल्लेख केला. हा कार्यक्रम म्हणजे ब्रह्माकुमारी दिव्य परिवाराच्या पवित्र सहवासात काही काळ घालवण्याची सुवर्णसंधीच आहे असे ते म्हणाले. WIRC, ICAI चे अध्यक्ष सीए ललित बजाज यांनी आजचा दिवस विशेष असल्याचे नमूद करत याच दिवशी सुरू होत असलेल्या सी.ए. परीक्षेकरिता सर्व परीक्षार्थींना शुभेच्छा देण्याची विनंती वक्ता व ब्रह्माकुमारी परिवारास केली. WIRC, ICAI च्या माजी अध्यक्ष व प्रादेशिक परिषदेच्या सदस्य सीए प्रीती सावला यांनी सीए शिक्षणात तांत्रिक भागाबरोबरच पक्षकारांच्या आर्थिक व्यवहार आणि कर आकारणी तपासताना येणारा ताण घालविण्यासाठी अशा प्रकारच्या व्याख्यानाची आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच आध्यात्मिक वातावरण आणि ज्ञानाचा लाभ घेण्याची हीच योग्य वेळ असल्याचे नमूद केले.

राजयोगिनी गोदावरी दीदी यांनी आपल्या आशीर्वचनपर भाषणांत 'सर्वशक्तिमान ईश्वराच्या सहवासात स्वतःला सुरक्षित ठेवा आणि प्रत्येक परिस्थितीत निश्चिंत रहा' असे आवाहन

केले. 'मुलंद को बुलंद' अर्थात् मुलुंड स्टडी सर्कलच्या सभासदांना अधिक सक्षम करण्यासाठी आपल्या व्यग्र वेळापत्रकातून विशेष वेळ दिल्याबद्दल ब्र. कु. शिवानी बहेन यांचे त्यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे निमंत्रक सीए ब्र. कु. बिपीन मुंदडा यांनी दहा वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या कार्यक्रमामागचा विचार सांगताना आध्यात्मिक वातावरण व अशा व्यक्तिमत्त्वांच्या सहवासाचे महत्त्व विशद केले. आध्यात्मिक प्रभावी विचारांतून होणाऱ्या सबलीकरणाचा उल्लेख करताना, दरवर्षी या कार्यक्रमाची सभासद किती आतुरतेने वाट पहात असतात हे आवर्जून नमूद केले. कार्यक्रमाची परंपरा अखंडित ठेवल्याबद्दल त्यांनी सर्व माजी निमंत्रक, अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य, तसेच उत्कृष्ट नियोजनाबद्दल ब्रह्माकुमारीज भांडुप सेवाकेंद्र संचालिका ब्र. कु. लाजवंती दीदी व सर्व ब्रह्माकुमारी परिवाराचे विशेष आभार मानले. स्टडी सर्कलच्या वतीने त्यांनी प्रमुख वक्त्या ब्र. कु. शिवानी बहेन यांचे आभार मानले व 'भावनिक प्रतिकार शक्तीचे व्यावसायिक जीवनात महत्त्व' या विषयावरील प्रवचनासाठी ऑनलाईन व्यासपीठावर त्यांचे स्वागत केले.

ब्र. कु. शिवानी बहेन यांनी व्यवसायात तांत्रिक ज्ञानासोबतच भावनिक गुणक (Emotional quotient) चांगला असण्याचे महत्त्व समजावून सांगितले. दररोज आपल्यासमोर सोशल मीडिया व ऑनलाईन माध्यमातून उपलब्ध असलेल्या माहितीच्या महासागरातून कोणत्या गोष्टी स्वीकाराव्यात वा नाकाराव्यात यावर विशेष लक्ष देण्याची नितांत गरज आहे, असे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात लहान-सहान गोष्टींत सकारात्मक बदल कशाप्रकारे घडवून आणू शकतो याचे वर्णन केले. भांडुप सेवाकेंद्रावर रोज फक्त एक तास देऊन ब्रह्माकुमारीजचा साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी सदस्यांना केले.

शिवानी बहेनच्या शांतिपूर्ण समालोचनाबरोबर राजयोगाच्या अनुभूतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

***

## *ऐकून तुझी बासरी*

मी गुंग जाहले ऐकून तुझी बासरी।
ना भान तनूचे असता देही परी ।।

स्तब्ध अचल जाहली मनातली वादळे
अंतर्यामी साज वाजतो संगीत हे जुळे
ही जीवननौका द्यावी बाबा तुझिया करी
मी गुंग जाहले ऐकून तुझी बासरी ।।१।।

मुरलीतील तो मधु भुलवी गोड
लाडक्या मुलांनो शब्द लावती ओढ
जीवनऋतू फुलला वर्षती अमृतसरी
मी गुंग जाहले ऐकून तुझी बासरी ।।२।।

ना विझणार दिवा ज्ञानाचा पेटला
संपली रात्र आज सूर्य मज भेटला
दशदिशा उजळती तू येता अवनीवरी
मी गुंग जाहले ऐकून तुझी बासरी ।।३।।

**ब्र. कु. छाया, मुलुंड (पूर्व)**

***

## निंदकाविषयी कबीर म्हणतात...

**निंदक मेरा जनि मरो, जीवो आदि जुगादि । कबीर सतगुरु पाइये, निंदक के परसादि।।**

हे माझ्या निंदका तू मरू नकोस, उलट दीर्घकाळ (युगे-युगे) जग. हे मनुष्यांनो! निंदकाच्या कृपेनेच तुम्हाला सद्‌गुरुचा लाभ होईल.

स्पष्टीकरण - निंदेमुळे होणाऱ्या दुःखापासून सुटका करून घेण्यासाठी तुम्ही तीव्र प्रयत्न कराल. याच प्रांजळ प्रयत्नातून तुम्हाला सद्‌गुरु प्राप्ती होईल.



पुणे दिघी : नवरात्रीमधील चैतन्य देवीच्या झांकीमध्ये नगरसेविका सौ. निर्मलाताई गायकवाड आणि डॉ. उज्ज्वला लिंगसे यांना ईश्वरी संदेश देताना ब्र. कु. ज्योती




मुलुंड : स्मरणिकेच्या प्रकाशन प्रसंगी ब्र.कु. वर्षा, माजी नगरसेवक जगजीवन तन्ना, समाजसेविका माया कोटरी व अन्य मान्यवर

Registration No. : MAHMAR/2007/21914

# भावपूर्ण श्रद्धांजली
## वरीष्ठ भ्राता ब्र.कु. अमीरचंदभाई



भ्राताजींचा लौकिक जन्म १९३९ झाला. अगदी तरुण वयातच त्यांना अलौकिक ज्ञानमार्गाचा परिचय झाला आणि १९५९ पासून ईश्वरी ज्ञानमार्गावर चालू लागले. तो काळ असा होता जेव्हा संस्थेला व ह्या ज्ञानमार्गात चालणाऱ्याला खूप विरोध सहन करावा लागत होता. भ्राता अमीरचंदजींनी आपल्या अनुभवात असं सांगितले की, त्यांचा साप्ताहिक पाठ्यक्रम चालू असताना त्यांना परान्न वर्ज करायचे असते हे तिसऱ्या दिवशी सांगितले गेले त्यावर ते म्हणाले, "हे तुम्ही मला आधीच का नाही सांगितलं तीन दिवस मी हॉटेलमधे चहा प्यायला व माझ्याकडून या नियमाचा भंग झाला." सांगण्याचा उद्देश हा की समाजाचा या ज्ञानाला विरोध असूनही भ्राताजींचा ईश्वरी ज्ञानावर व शिवबाबांवर खूप कमी कालावधीमधे निश्चय बसला. या सोप्या धारणा करतानासुद्धा कुठलाही किन्तु-परन्तु मनात आला नाही. हे ज्ञान जसं आहे तसं स्वीकारलं.

भ्राताजींचे व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण होते. नेहमी हसतमुख चेहरा ही त्यांची प्रमुख ओळख होती. सरळ साधा स्वभाव आणि साधी राहणी सर्वांना प्रभावित करत असे. नावाप्रमाणे गुणांची श्रीमंती त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून झळकत असे. त्यांच्या उदारचित्त वृत्तीचे आणि सालस सुसंस्कृत स्वभावाचे दर्शन वागण्या-बोलण्यातून घडत असे. ईश्वरी ज्ञानदान करताना ते जणू प्रति ज्ञानसागरच भासत. अनेकांना त्यांनी अध्यात्म मार्गस्थ केले. या मार्गावर चालताना येणाऱ्या अडचणींत मार्गदर्शक बनले. त्यांची शिवबाबांविषयीची अर्पणमय स्थिती आणि सन्तुष्ट अवस्था सर्वांसाठी कायम प्रेरणादायी ठरली. त्यांचा त्याग व तपस्या ब्रह्माबाबांची आठवण करून देणारा होता.

चण्डीगढ, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखण्ड अशा अनेक प्रांतात भ्राताजींनी ईश्वरी सेवेत मोठा वाटा उालला आणि प्रमुख संचालक म्हणून कार्यभारही सांभाळला. तसेच ते समाजसेवा प्रभागाचे उपाध्यक्ष या नात्याने कामकाज पाहत असत. इंग्लंड, रशिया, जर्मनी स्पेनसारख्या देशांतील सेवेतही त्यांनी आपल्या सेवेद्वारे सुगंध पसरविला. संस्थेच्या मॅनेजिंग कमिटीचे विशेष सदस्य होते.

भ्राताजींनी २८ नोव्हेंबर २०२० रोजी आपला देह त्यागला आणि बापदादांच्या कुशीत सामावून गेले.

अशा महान आत्म्यास ब्र. कु. गोदावरी दीदी व समस्त ब्र. कु. परिवारातर्फे श्रद्धांजली!